# ISBN PAPER AND BOOKS

# 2019 - 20

Scanned with OKEN Scanner

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती संलग्नित
आणि
श्री दादासाहेब गवई चॅरीटेबल ट्रस्ट, अमरावती द्वारा संचालित

# तक्षशिला महाविद्यालय, अमरावती समाजशास्त्र विभाग

आणि

# मराठी समाजशास्त्र परिषद

यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

## मराठी समाजशास्त्र परिषदेचे ३० वे राष्ट्रीय अधिवेशन

दि. २३ व २४ जानेवारी २०२०

-: विषय :-

## भारतातील समाजशास्त्राची शतकपूर्ती

स्थळ
"राजवाडा"
देशमुख लॉन समोर, शेगाव नाका रोड, अमरावती

आयोजक
समाजशास्त्र विभाग
तक्षशिला महाविद्यालय, अमरावती

Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| 22 | भारतीय समाजशास्त्रज्ञांचे समाजशास्त्रात योगदान – डॉ. जी. एस. घुर्ये | डॉ. श्रीमती शोभा आबासाहेब मधाळे | 93 |
| 23 | भारतीय समाजशास्त्राच्या विकासात भारतीय समाजशास्त्रज्ञांचे योगदान | प्रा.डॉ.विलास चव्हाण | 102 |
| 24 | समाजशास्त्राचा उदय आणि विकास | प्रा. डॉ.अनिल पी.जैन | 105 |
| 25 | भारतीय समाजशास्त्रज्ञांचे समाजशास्त्रातील योगदान | प्रा. ईश्वर ल. राठोड | 109 |
| 26 | भारतीय समाजशास्त्रज्ञांचे समाजशास्त्रातील योगदान | संदीप महादेवराव हाडोळे | 112 |
| 27 | भारतातील समाजशास्त्राच्या विकासात डॉ. एम.एन. श्रीनिवास यांचे योगदान | प्रा. डॉ. रामेश्वर एम. मोरे | 117 |
| 28 | डॉ.डी. पी. मुखर्जी यांचे मार्क्सवादीव्दंदात्मक दृष्टीकोन | प्रा. पितांबर विठोबाजी पिसे | 123 |
| 29 | भारतातील स्वातंत्र्यपूर्व काळातील दलित चळवळीचे... एक समाजशास्त्रीय अध्ययन | प्रा.डॉ.सुजाता.आर.नाईक (गवई) | 125 |
| 30 | भारतीय समाजशास्त्रज्ञांचे समाजशास्त्रात योगदान | डॉ. मधुकर चाटसे | 132 |
| 31 | ''बुध्दकालीन आणि वर्तमान भारतीय समाजदर्शन'' | खिल्लारे शंकर अर्जन | 134 |
| 32 | भारतीय समाजशास्त्रज्ञांचे समाजशास्त्रातील योगदान | डॉ. रमेश वि णु मोरे | 138 |
| 33 | भारतातील सामाजीक चळवळीचे समाजशास्त्रीय अध्ययन | प्रा. राजकुमार भगत | 146 |
| 34 | डॉ.बी.आर.आंबेडकराचे अस्पृश्यता निर्मूलनाचे विचार समाजशास्त्राच्या विकासातील एक योगदान | प्रा.डॉ.शेकोबा परशुराम ढोले | 153 |
| 35 | भारतीय समाजशास्त्रज्ञांचे समाजशास्त्रात योगदान | डॉ. प्रा. ए.आर. वागडव | 158 |
| 36 | सद्यस्थितीत समाजशास्त्रज्ञांसमोरिल आव्हाने | कु. क्रिष्णा पासवान, | 161 |
| 37 | भारतातील सामाजिक परिवर्तनामधील समाजशास्त्राची उपयोगिता | भोसले एस.ई. | 168 |
| 38 | शोषित अंकितजन दृष्टिकोण आणि भारतीय समाजशास्त्रज्ञ | अमोल आदिनाथ अवचार | 170 |
| 39 | भारतातील सद्यस्थितीतील समाजशास्त्रज्ञांसमोरील आव्हाने : एक अध्ययन | प्रा.डॉ.मारोती मोतीराम बामणे | 175 |
| 40 | भारतीय समाजाच्या विकासामध्ये समाजशास्त्राची उपयोगिता | प्रा. नंदकिशोर राउत | 178 |
| 41 | भारतीय समाजशास्त्राची शतकपुर्ती | श्री. पवार बळीराम वसंतराव | 183 |
| 42 | डॉ. जी.एस. धुर्ये यांचे समाजशास्त्रातील योगदान | डॉ. ज्योती शेषराव दिघाडे | 185 |
| 43 | समाजशास्त्रज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान | डॉ. किशोर उत्तमराव राऊत | 188 |
| 44 | भारतीय समाजशास्त्रज्ञांचे समाजशास्त्रातील योगदान | प्रा. डॉ. सतिश देसाई | 192 |
| 45 | भारतीय समाजशास्त्राच्या विकासात सामाजिक विचारवंतांचे योगदान – एक समाजशास्त्रीय अध्ययन | प्रा. डॉ. सुधा मु. खडके (कडू) | 199 |
| 46 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची सामाजिक चळवळ आणि समाजशास्त्र | प्रा. सोमा पी. गोंडाने | 204 |
| 47 | भारतीय समाजशास्त्रज्ञांचे समाजशास्त्रात योगदान | प्रा डॉ. माया बी. | 209 |


Scanned with OKEN Scanner

# भारतीय समाजशास्त्रज्ञांचे समाजशास्त्रातील योगदान

प्रा. ईश्वर ल. राठोड
समाजशास्त्र विभागप्रमुख,
शि. म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब

प्रस्तावना :

समाजशास्त्राचे शतकोत्तर वर्ष पुर्ण करत असतांना समाजशास्त्रातील समाजशास्त्रज्ञांचे योगदान या संदर्भात अभ्यास होणे गरजेचे आहे. भारतीय समाजशास्त्रात सर्व समाजशास्त्रज्ञांचे मोलाचे योगदान असलेले दिसून येते. प्रत्येक समाजशास्त्रज्ञांनी आपआपल्या क्षेत्रीय अभ्यासानुसार भारतीय समाज व्यवस्थेचा अभ्यास करून आपले स्वतःचे सिध्दांत मांडण्याचे प्रयत्न केले आहे. सर्व समाजशास्त्रज्ञांनी भारतीय सामाजिक शास्त्रात वैज्ञानिक दृष्टिकोनाचा स्विकार करून अभ्यास केलेला दिसून येतो. भारतीय समाजाचा अभ्यास करणाऱ्या शास्त्रज्ञांमध्ये अनेक भारतीय समाजशास्त्रज्ञांचा समावेश होतो. खरे तर स्वतंत्र पूर्व कालखंडात भारतात समाजशास्त्र या विषयाला अभ्यासकमाच्या अनुषंगाने सुरूवात झाली. भारतीय समाजशास्त्राचे जनक म्हणून जी. एस. घुर्ये यांचा प्रामुख्याने उल्लेख केला जातो. परंतु 1916 लाच डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी भारतीय समाजव्यवस्थेचा अभ्यास करून भारतीय जातीव्यवस्था कशा स्वरूपाची आहे, या संदर्भात आपले संशोधनपर पेपर सादर करून एक थोर समाजशास्त्रज्ञ म्हणून जागतिक पातळीवर परिचित झाले. परंतु भारतीय अभ्यासकांनी ते विचार पुढे येवू दिले नाहीत.

ब्रिटिश कालखंडात भारतात समाजशास्त्र या विषयाला शिकविण्यास प्रारंभ झाले असले तरी खऱ्या अर्थाने पेट्रिक गेडीस यांचा फार मोलाचा वाटा असलेला दिसून येतो. घुर्ये यांच्या सोबतच राधाकमल मुखर्जी, डी. पी. मुखर्जी, ब्रिजेंद्रनाथ सील, बी. के. सरकार, बी. एस. गुहा इ. अनेक भारतीय समाजशास्त्रज्ञांचाही योगदान समाजशास्त्रांच्या विकासात दिसून येतो. थोर समाजसुधारक तथा भारतीय समाजशास्त्रातील महत्वपूर्ण योगदान देणारे थोर भारतीय समाजशास्त्रज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भारतीय समाजव्यसस्थेच्या अभ्यासातील महत्वपूर्ण योगदान असलेले दिसून येते. भारतीय समाजातील संपूर्ण जाती व्यवस्थेचा अभ्यास करून जाती व्यवस्था नष्ट व्हावी यासाठी डॉ. आंबेडकरांनी आपल्या सामाजिक चळवळी, प्रबोधन, वैचारिक परिवर्तन, प्रत्यक्ष समाजामध्ये जावून सामाजिक बदलासाठी प्रयत्न केले.

ज्या पध्दतीने समाजशास्त्रज्ञांनी आपले योगदान समाजशास्त्राच्या विकासासाठी दिले, त्याच पध्दतीने समग्र समाज व्यवस्थेत बदल होत गेले. परंतु आजही काही बाबतीत बदल होणे गरजेचे आहे. या परिवर्तनासाठी आजच्या संशोधकांकडून तसे संशोधन होणे फार गरजेचे आहे, असे आजच्या समाजव्यवस्थेच्या अभ्यासावरून लक्षात येते.

अभ्यास विषयाचे महत्व :

प्रस्तुत शोधनिबंधात भारतीय समाजशास्त्रज्ञांचे समाजशास्त्रातील योगदान या संदर्भात मांडणी केली जाणार आहे. सर्व भारतीय समाजशास्त्रज्ञांनी वेगवेगळया सिध्दांताच्या आधारे भारतीय समाजातील सर्व बाबींचा अभ्यास केलेला आहे. पारंपारिक ते आधुनिक समाजाचा अभ्यास भारतीय समाजशास्त्रज्ञांनी केलेला दिसून येतो. म्हणून या सर्व समाजशास्त्रज्ञांच्या समाजशास्त्रातील योगदानाचे अभ्यासाचे महत्व जाणून घेणे तितकेच महत्वाचे वाटते. म्हणून हा शोधनिबंध समाजशास्त्रज्ञांच्या समाजशास्त्रातील योगदानाचे महत्व स्पष्ट करण्यासंदर्भात आहे.

संशोधनाची उद्दिष्टे :

1. भारतीय समाजशास्त्रज्ञांच्या समाजशास्त्रातील योगदान समजून घेणे.
2. समाजशास्त्रज्ञांनी अभ्यासलेल्या पध्दतींचे महत्व समजून घेणे.



Scanned with OKEN Scanner

3. समाजशास्त्रज्ञांनी मांडलेले विविध सिध्दांत समजून घेणे.

**संशोधन पध्दती :**

शोधनिबंध हा संशोधनाचा एक भाग असतो. ज्या प्रमाणे संशोधनातून संशोधक हा एखाद्या समस्येचे सुत्रण करतो आणि निष्कर्षाप्रत जातो. त्याचप्रमाणे शोध निबंधात देखील एखाधी समस्या निश्चित करून त्या समस्येची कारणमिमांसा केली जाते. प्रस्तुत शोध निबंधासाठी वर्णणात्मक पध्दतीचा अवलंब करण्यात आला असून माहितीचे स्त्रोत म्हणून संदर्भ ग्रंथ, मासिके आणि वृत्तपत्रांचा वापर करण्यात आलेला आहे.

**भारतीय समाजशास्त्रज्ञांचे योगदान :**

भारतीय समाजशास्त्रात अनेक समाजशास्त्रज्ञांनी आपले योगदान दिलेले आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळातील आणि स्वातंत्र्योत्तर काळातील समाजशास्त्रज्ञ यांनी वेगवेगळया प्रसंगी वेगवेगळे सिध्दात मांडून भारतीय समाजाचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला आहे. याप्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि डॉ. जी. एस. घुर्ये यांच्या समाजशास्त्रातील योगदानाबद्दल सैध्दांतिक कार्य मांडण्याचे प्रयत्न केले जाणार आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक थोर समाजशास्त्रज्ञ म्हणूनच सर्व परिचित असल्याचे दिसून येते. कारण की, डॉ. आंबेडकरांनी संपूर्ण भारतीय समाजव्यवस्थेचा अध्ययन फार जवळून केलेला दिसून येतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या समाजशास्त्रीय अध्ययनाला येथील अभ्यासकांनी दखल घेतली नव्हती, ही एक वास्तविकता आहे, असेच म्हणावे लागेल. परंतु एकूण व्यवस्थेला आपल्या अभ्यासाच्या माध्यमातून डॉ. आंबेडकरांनी जनसामान्य लोकांच्या हितासाठी, कल्याणासाठी, भारतीय व्यवस्थेचे वास्तव रूप समजून घेतल्यानंतर सर्वसामान्य समाजाला एकसंघ करण्यासाठी आपल्या कार्यातून प्रयत्न केलेले दिसून येते.

भारतीय जातीव्यवस्था समजून घेतल्यानंतर जातीव्यवस्थेच्या संदर्भात अत्यंत सुक्ष्मपणे वैज्ञानिक अध्ययन करण्याचे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले आहे. परंतु भारतीय व्यवस्थेनी त्यांचे अभ्यास पुढे येवू दिले नाही. व जनसामान्य लोकांना माहिती देखील होवू दिले नाही. 1916 ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी Caste in India, its Mechanism, Genesis and Development हा संशोधनपर पेपर सादर करून वयाच्या 25 व्या वर्षी आपली अभ्यासाची वेगळी ओळख निर्माण केलेली दिसून येते. डॉ. आंबेडकर असे म्हणतात की, बहिर्विवाहावर अंतर्विवाहाचे वर्चस्व हेच खरे तत्व जातीच्या निर्मितीस कारणीभूत होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे संशोधनात्मक लेखन करणारे फार मोठे समाजशास्त्रज्ञ होते. आपल्या अध्ययनात वस्तूनिष्ठ पध्दतीने संशोधनात्मक मार्गाचा अवलंब करून अनेक महत्वपूर्ण समाजशास्त्रीय सिध्दात मांडले आहेत. म्हणून डॉ. आंबेडकर हे केवळ एक सामाजिक विचारवंत नसून ते एक थोर समाजशास्त्रज्ञ होते असे त्यांच्या ग्रंथाच्या अध्ययनावरून सिध्द हाते. त्यांच्या ग्रंथांमुळे भारतातील समाजशास्त्रीय संशोधनाला मौलिक असे योगदान मिळाले आहे.

भारतातील काही अपवादात्मक विचारवंत सोडल्यास डॉ. आंबेडकरांपूर्वी इतर कोणत्याही विचारवंताने समाजशास्त्रीय विचार मांडले नाहीत. विशेष म्हणजे भारतीय समाजव्यवस्थेसंबंधीचे अध्ययन करून समाजशास्त्रीय संशोधनाची दखल नंरतच्या भारतीय समाजशास्त्रज्ञांनी घेतलेली दिसून येत नाही. त्यामुळे डॉ. आंबेडकरांचे समाजशास्त्रीय अध्ययन आजपर्यंत दुर्लक्षितच राहिले होते. परंतु आजच्या सामाजिक भान असलेल्या अभ्यासकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सिंध्दातांचा आधार घेवून भारतीय समाजाचा अभ्यास करणारे फार मोठया प्रमाणात संशोधक निर्माण झालेले आहेत. भारत आणि जागतिक पातळीवर देखील डॉ. आंबेडकरांचे विचार हे जनसामान्य समाजामध्ये नवचैतन्य निर्माण करणारेच आहेत, असेच म्हणावे लागेल.



Scanned with OKEN Scanner

डॉ. जी. घुर्ये यांच्या संशोधनात्मक अभ्यासाचा आढावा घेतल्यास असे लक्षात येते की, घुर्ये यांनी त्यांच्या अभ्यासातून समाजव्यवस्था आणि समाजजीवनांचा जवळून अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे. घुर्येनी आपल्या संशोधनात्मक अध्ययनात विज्ञाननिष्ठतेवर, तर्कशुध्दतेवर, वस्तुनिष्ठतेवर पुर्णपणे भर देवून आपल्या विचारांची माडणी करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. जी. एस. घुर्ये यांनी सैध्दातिक व सर्वेक्षणात्मक पातळीवर त्यांनी आपले जे वैशिष्टयपूर्ण स्थान प्राप्त केले आहे. त्याचे अध्ययन भारतीय अभ्यासकांनी करून घेणे अत्यंत गरजेचे असल्याचे दिसून येते.

डॉ. घुर्ये यांच्या सर्व संशोधनात्मक अध्ययनातून जातिव्यवस्थेच्या उत्पत्ती संबंधीचा प्रजातीय किंवा वांशिक सिध्दांत हा फार महत्वाचा ठरलेला आहे. कारण त्यांनी आपल्या आचार्य पदवीसाठी निवडलेला हा विषय प्रत्यक्षपणे अध्ययन करून मांडण्यांचा प्रयत्न केला आहे.

ब्रिटिश काळात भारतातील जातिव्यवस्थेबाबत अनेक पाश्चात्य विचारवंतांनी सूक्ष्म अध्ययन केले. परंतु त्यांचे अध्ययन जातिनिष्ठ समाजरचनेतील विभिन्न जाती समुदायांतील परस्पर संबंधाशी निगडित होते. मात्र डॉ. घुर्येनी जातिव्यवस्थेच्या उत्पत्तीसंबंधी सूक्ष्म अध्ययन करून वांशिक संकल्पना जातिव्यवस्थेच्या निर्मितीस कशी कारणीभूत आहेत याचे समाजशास्त्रीयदृष्टया विवेचन केलेले आहे.

डॉ. घुर्ये यांचा जातिव्यवस्थेकडे पाहण्याचा वांशिक दृष्टिकोन हा समाजशास्त्राच्या संशोधनात्मक अध्ययनातील संपूर्णतः आगळा व वेगळा दृष्टिकोण मानला जातो. कारण त्यांच्या अगोदर जातिव्यस्थेबद्दल अनेक पाश्चात्य विचारवंतांनी जी मते मांडली, ती जातिव्यवस्थेच्या निर्मितीपेक्षा जाती समुदायातील परस्परसंबंधावर प्रामुख्याने आधारलेली होती, असे बऱ्याच विचारवंतांचे मत आहे.

जातिव्यवस्थेबाबत डॉ. घुर्येनी काढलेले निष्कर्ष वास्तवतेशी जरी निगडित असले तरी प्रत्येक जाती–पोटजातीत विविध प्रकारच्या ज्या समस्या निर्माण झालेल्या आहेत, त्या समस्याबाबत विवेचन करणेही आवश्यक आहे. विषमतेवर आधारलेल्या जातिनिहाय समाजव्यवस्थेवर वरिष्ठांनी कनिष्ठ जातीतील लोकांना अमानवी, असामाजिक वागणूक दिली, त्यामुळे सन्मानाने जीवन कंठण्याचा अधिकार कनिष्ठ जातीतील लोकांना मिळू शकला नाही. श्रेष्ठ–कनिष्ठतेच्या जाणिवेतून प्रत्येक जाती–पोटजातीत समूहश्रेष्ठत्वाची भावना विकसित होवू लागल्याने विभिन्न जाती समुदायांत सामाजिक दुरत्व निर्माण होवू लागले. अशा अनेक प्रकारच्या समस्या समाजव्यवस्थेत असलेल्या दिसून येतात.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर जातिवादाचे निर्मूलन करण्यासाठी अनेक घटनात्मक, प्रशासकीय, आर्थिक व राजकीय क्षेत्रांत आमूलाग्र स्वरूपाचे बदल करून सुध्दा व शिक्षणाचा अधिकाधिक प्रसार होऊन सुध्दा लोकांच्या मनातील जातीय भावना नष्ट होऊ शकल्या नाहीत. जातिनिरपेक्ष स्वरूपाचे संस्कार नवीन पिढीवर जोपर्यंत होत नाहीत तोपर्यंत जातिवादाची संकल्पना नष्ट होणार नाही. यासाठी आजच्या अभ्यासकांनी सुक्ष्म अध्ययन करून समाजातील जातीव्यवस्था नष्ट करण्यासाठी तसे प्रयत्न करणे गरजेचे आहे. भारतीय समाजशास्त्रात घुर्येनी दिलेल्या योगदानाप्रमाणेच इतर अन्य अभ्यासकांनी दिलेला आहे. परंतु प्रत्येकांची अभ्यासपध्दती मात्र वेगवेगळी असल्याचे दिसून येते.

संदर्भ :


1. मारूलकर, गजेंद्रगड, समकालीन भारतीय समाजशास्त्रज्ञ, फडके प्रकाशन, पुणे.
2. सोमण मा. श. (1992), समाजशास्त्रीय विचार, नरेंद्र प्रकाशन, पुणे.
3. आगलावे प्रदिप (2007), समाजशास्त्रीय विचारवंत, श्री साईनाथ प्रकाशन, पुणे.



ISBN No. : 978-81-941195-4-8
Scanned with OKEN Scanner

ISBN : 978-81-939613-2-2



# अण्णा भाऊ साठे : समतावादी साहित्यीक

संपादक
डॉ. दिपक सुर्यवंशी
डॉ. सदाशिव भुयारे
अनुप्रिता मोरे

Scanned with OKEN Scanner

1

ISBN : 978-81-939613-2-2



# अण्णा भाऊ साठे : समतावादी साहित्यीक

संपादक
डॉ. दिपक सुर्यवंशी
डॉ. सदाशिव भुयारे
अनुप्रिता मोरे

Scanned with OKEN Scanner

1) डॉ. दिपक सुर्यवंशी
2) डॉ. सदाशिव भुयारे
3) अनुप्रिता मोरे

1) डॉ.दिपक सुर्यवंशी : शिक्षणमहर्शी ज्ञानदेव माहेकर महाविद्यालय कळंब मराठी विभागात सहा. प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत.पदवी पदव्युत्तर स्तरावर एकुण 12 वर्षे अध्यापणाचा त्यांचा अनुभव आहे.सामाजिक तथा शैक्षणिक क्षेत्रात त्यांनी उल्लेखनिय कार्य केलेले आहेत.विद्याभुषण पुरस्कार, महात्मा फुले शिक्षकरत्न पुरस्कार, लोकमंगल मल्टिस्टेटचा शिक्षकरत्न पुरस्कार तथा एकता फाउडेंशन उस्मानाबादचा आदर्श शिक्षक पुरस्कार अशा एकून 7 पुरस्काराने त्यांना गौरविण्यात आलेले आहे.

2) डॉ. सदाशिव भुयारे :

प्रा.सदाशिव राजाराम भुयारे यांनी यशवंत महाविद्यालय, नांदेड येथे पदवी व पदव्युत्तर अर्थशास्त्र विभागात १३ वर्षे अध्यापनाचे कार्य केले आहे.सध्या ते शंकरराव चव्हाण महाविद्यालय, अर्धापूर येथे अर्थशास्त्र विभागप्रमुख तथा प्रभारी वाणिज्य विभाग म्हणून कार्यरत आहेत.त्यांनी अर्थशास्त्र अंर्तविद्याशाखीय राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर १० शोधनिबंध प्रकाशित केले आहेत.याशिवाय राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर ११ शोधनिबंधाचे वाचन केले आहे. त्यांना पंचायत राज संस्था व ग्रामीण विकास या प्रबंधासाठी यु.जी.सी.ची राष्ट्रीय फेलोशिप प्राप्त झाली आहे.याशिवाय पुरोगामी महामानवांच्या विचारांवर भाषणाच्या माध्यमातून समाज प्रबोधनाचे कार्य सक्रियपणे पार पाडीत आहेत. सद्यस्थितीत सामाजिक व राजकीय चळवळीत सक्रिय असून भारतीय कम्युनिस्ट पार्टी (युनायटेड) राष्ट्रीय जनरल सेक्रेटरी म्हणून कार्य

3) सौ. अनुप्रिता मोरे : वनस्पतीशास्त्र विषयाच्यास अभ्यासका असून त्यांची संदिप युनिर्व्हसिटी नाशिक येथे वनस्पतीशास्त्र विषयाच्या संशोधक विद्यार्थीनी म्हणून त्या कार्यरत आहेत. अण्णा भाऊ साठे यांच्या विचारांचा जागर व्हावा या उद्देशाने त्यांनी दोन अंतराष्ट्रीय चर्चा सत्राचे आयोजन केले आहे.तसेच त्यांच्या नाववर एक संपादित ग्रंथ आहे.सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करतांना त्या दिसून येतात.

ISBN : 978-81-939613-2-2

Publisher
Arun B. Godam
Latur, Dist. Latur-413512
(Maharashtra, India)
Mob. 7020796909

SHAURYA PUBLICATION
Latur
Publisher
Shaurya Publication

www.publishjournal.co.in

Scanned with OKEN Scanner

**DECLARATION BY THE PUBLISHER**

**ISBN : 978-81-9396-2-2**

संपादक

डॉ. दिपक सुर्यवंशी
डॉ. सदाशिव भुयारे
अनुप्रिता मोरे

**Publication**
Shaurya Publication
Khadgao Road, Kapil Nagar, Latur-413512
Email-hitechresearch11@gmail.com

**Printing**
Shaurya Offset, MIDC, Latur

**First Edtion–14th Dec. 2019**

**Note :-** Views, idea and materials published in this ISBN Book are intellectual properties of author (s). Author(s) is/ are solely responsible for their publication and not the Editors, Principal or publisher.

© All right are reserved. No part of this publication may be reproduced, stored, retrieved or transmitted in any form, by any means, without the written permission from **Dr. Deepak Surwanshi, Dr. Sadashiv Bhuyare, Anuprita More**





# दोन शब्द... :

लोकशाहीर, कवी, नाटककार, कथाकार, कादंबरीकार, संयुक्त महराष्ट्र निर्मीतीच्या लढयाचे लोकनायक, वैश्विक तत्वज्ञ, समाजशास्त्रज्ञ, व साहित्य रत्न अशा नावांनी अण्णा भाऊ साठे हे जागतिक स्तरावर प्रख्यात आहेत. अण्णा हे अक्षर साहित्याचे उदगाते व विद्रोही मुल्यांचे सर्जक आहेत.त्यांची लेखनी ही सत्याशी व मुल्याशी इमान राखनारी आहे.शोषण व अन्याय सहनकरीत घाम गाळणाऱ्या व कष्ट करणाऱ्या मानसांच्या डोळयातील आश्रुंची माषा अण्णाना समजली होती.
विद्रोह, आक्रोश, बंड, चीड, जातियता, नकार, विरोध, उठाव व संताप यासारख्या समग्र परिवर्तनाच्या शासवत मुल्यांची त्यांनी पेरणी करून समाजाला दास्यमुक्ती व जीवनमुक्तीचा मार्ग दाखवित निर्भयपणाने वैचारीक बंड उभारले. अण्णांच्या साहित्यातून विषमतावादी साहित्यातील विद्रुपता आणि क्रुरतेचे दर्शन होते.अण्णाच्या सहित्यात समता, स्वातंत्र्य, न्याय व बंधुत्वावाचे मानवतावादी तत्वज्ञान आहे.स्त्रीत्वाचा आत्मसन्मान व प्रतिष्ठेचा आहे.विज्ञान धिष्ठतेचा आग्रह आहे.माणूसपण नाकारणाऱ्या अमानवीय व्यवस्थेविरूध्दचा यल्लगार आहे.हा देश, या देशाची जनता सुखी व्हावी व या देशाचे नंदनवण व्हावे अशी अण्णांची क्रांतीकारी स्वप्ने आहेत.माणूस हाच खऱ्या अर्थाने जगातील प्रत्येक क्रांतीचा उद्गाता असल्याचे अण्णांचे स्पष्ट मत होते.मरत मरत जगणारी माणसं ही खऱ्या अर्थाने जगतच नसतात तर या उलट लढून मरणारी मानसं ही मरूनही जिवंत रहातात हे मुख्य जिवनसुत्र अण्णांच्या साहित्यात आहे.विशेष म्हणजे अण्णांचे समग्र साहित्य निर्मीतीच्या गुणवत्तेचे मानदंड आहे.

विश्वसाहित्य रत्न आण्णा भाऊ साठे यांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या निमीत्ताने त्यांना विनंम्र अभिवादन व या एकदिवशीय अंतरविद्याशाखीय परिषदेचे आयोजक प्रा.डॉ.रमेश लाडंगे यांचे हर्दिक अभिनंदन. या निमित्ताने प्रकाशित होणारे हे पुस्तक संशोधक विद्यार्थी तथा शैक्षणिकक्षेत्रात मैलाचा दगड ठरेल ही अपेक्षा...!

प्रा.डॉ. माधव बसवंते
नांदेड

ISBN : 978-81-939613-2-2

# साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या चिंतनातील मानवतावादी दृष्टीकोन

प्रा. डॉ. दीपक सुभाषराव सूर्यवंशी
मराठी विभाग, शि.म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय,कळंब, ता. कळंब, जि. उस्मानाबाद

---

**प्रास्ताविक :**

प्रचंड गरीबी अन् दारिद्र्यात जीवन जगणाऱ्या कुटूंबात सांगली जिल्ह्यातील वारणा नदीच्या खोऱ्यातील वाटेगाव या खेड्यात मांग जातीत १ ऑगस्ट १९२० रोजी अण्णाभाऊ साठे यांचा जन्म झाला. वयाच्या दहाव्या वर्षी दीड दिवस शाळेत जाऊन शाळा सोडून दिली. बालपणी कोळसा, हमाल, घरगडी, हेलकरी अशा प्रकारची अनेक कामे केली. मावसभावाबरोबर कपड्याचे गाठोडे घेऊन मुंबईत अनवाणी फिरून मुंबईतल्या पाट्या वाचून अण्णाभाऊ साक्षर झाले आणि खऱ्या अर्थाने ते साहित्यातून अनुभवाचे विद्यापीठ झाले. त्याचवेळी आईला त्यांनी शब्द दिला, "आई मी जगाच्या शाळेत शिकेन, मोठा होऊन तुझे नाव उज्ज्वल करेल." अन् तो खरा ठरवला. गिरणी कामगार झाले. कष्टप्रद जीवन जगताना आलेले कटू अनुभव लिखाणाद्वारे समाजासमोर मांडले. कादंबरीकार, कथाकार, नाटककार, शाहीर व लोकनाट्य लेखन करून कलापथकाच्या माध्यमातून लोकजागृती अखंडपणे केली. त्यातूनच ते साहित्यसम्राट आपले अनुभव मांडताना ते म्हणत, "मला कल्पनेचे पंख लावून भरारी मारता येत नाही, त्या बाबतीत मी स्वतःला बेडूक समजतो." त्यांच्या लेखनाचे दीन-दलित, उपेक्षित व वंचित समाजातील लोक त्यांचे सुख-दुःख केंद्र राहिले. वास्तव जीवनानुभव, कथा-वेदना, इर्षा, जिद्द आणि कष्टकऱ्यांचा संघर्ष त्यातून अभिव्यक्त केला आहे. साहित्य समाजपरिवर्तनाचे माध्यम असून सामाजिक बांधिलकीसाठी साहित्यिक लेखन करत असतात. साहित्यात जीवनाचे अनुभव मांडणारे ते जातिवंत साहित्यिक ठरतात. त्यांनी तत्वज्ञान अथवा अंधःश्रद्धा निर्मूलनाविषयीच्या प्रेरणा कोणत्याही ग्रंथातून घेतल्या नाहीत. आपल्या लेखणीद्वारे वास्तवाला भिडणारे विचार परखडपणे व्यक्त केले.

अण्णा भाऊ साठे यांनी १९ कथासंग्रह, ३७ कादंबऱ्या, २ नाटके, शेकडो गाणी, १० लोकनाट्य, २ शाहिरी वाङ्मय व ७ चित्रपट कथा लिहिल्या आहेत. यातून उपेक्षितांच्या अंतरंगाचे पैलू विशद केले आहेत. त्यांनी एक अजरामर प्रेरणादायी गीत लिहिले,

जग बदल घालूनी घाव । सांगून गेले मला भीमराव ।।
गुलामगिरीच्या या चिखलात । रूतून बसला कोसवत ।।

बाबासाहेबांच्या विचारावर त्यांची असीम निष्ठा होती. त्यातून त्यांनी "हे जग, ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर नसून दलितांच्या / कष्टकऱ्यांच्या तळहातावर तरलेली आहे." अशा प्रकारचे तत्वज्ञान सांगितले. तत्कालिन सामाजिक परिस्थितीत अण्णाभाऊंचे साहित्य रूपवादी, रंजनपर व परधार्जिन





आणि भडक आहे. ते साहित्य बाह्य प्रेरणेवर आधारलेले आहे अशी टीका झाली. मराठी कादंबरीचे शतक लिहिणाऱ्या कुसुमावती देशपांडे यांनी तर कोण हे अण्णा भाऊ साठे? असा प्रश्नच केला होता. दिवसभर कामानिमित्त फिरताना मुंबई मायानगरीचे चित्रण करत ते लिहितात,

मुंबईत उंचावरी । मलबार हिल इंद्रपुरी ।
कुबेराची वस्ती तिथ सुख भोगती ।।
परळात राहणारे । रात दिन राबणारे ।
मिळेल ते खाऊन घाम गाळती ।।

खऱ्या अर्थाने मुंबईनगरी ही गर्भश्रीमंताची असल्याचे साहित्यिकांनी नोंदविले पण भाऊंना तीचा विषमव्यवस्थेची प्रतीक वाटते. वाटेगावच्या परिसरातील निसर्गसौंदर्य, तुडुंब भरलेल्या नद्या, ग्रामदेवतांच्या यात्रा-खेत्रात उत्सवी वातावरणात बालपण गेले. जत्रेत मर्दांनी दांडपट्टे, मर्दांनी खेळ वाजविण्यापासून, आख्यायिका, ओव्यांचा त्यांच्या मनावर अमीट ठसा उमटला. पातिव्रत्याचे पालन करणाऱ्या स्त्रिया अवतीभोवती होत्या, त्याच निष्ठावान स्त्रियांचे होणारे शोषण तसेच झोपडपट्टीतील उघडे-वाघडे जगणे, उपाशी पोटी राहणे, त्यातून प्रचंड निर्माण होणारी वेदना, चीड, भूकेची शमवणूक करण्यासाठी केलेला अवैध मार्गाचा स्वीकार या भयानक अनुभवांचे शिक्षण त्यांना पावलोपावली मिळाले, अनुभवाचे शिक्षण हेच खरे शिक्षण याची खात्री त्यांना पटली.

**स्मशानातील सोन :**

ही कथा भीमाच्या कष्टकरी जीवनाचे चित्रण करते. गावात काम नसल्याने तो मुंबईला जातो, खाणीत कष्टाचे काम करतो मात्र खाण बंद पडल्याने उपाशी असणारा भीमा स्मशानातून सोनं शोधण्याचे काम सुरू करतो. एका रात्रीत भीमा पुरलेलं प्रेत उकरताना कोल्हा-लांडग्यांच्या हिंस्त्र प्राण्यांमध्ये झुंड होते. त्याच झटापटीत प्रेताच्या जबड्यात भीमाचा हात अडकून त्याच्या हाताची बोटे तुटतात, त्याचेवेळी खाणीचे बंद पडलेले काम सुरू होते. पण भीमाच्या हाताला काम करण्यासाठी मात्र बोटे नसतात. अत्यंत भयानक असलेल्या दारिद्र्याचे वास्तव कथेत भाऊंनी रेखाटले आहे. त्यांनी लेखनामागील भूमिका मांडताना ते म्हणतात, "माझी जीवनावर फार निष्ठा असून मला माणसे फार आवडतात, त्यांची श्रमशक्ती फार महान आहे. त्यांच्या बळावरच हे जग चालतं. त्यांची झुंज व त्यांच यश यावर माझा विश्वास आहे."

सण-उत्सव, जत्राखेत्रा, बैलगाड्यांच्या शर्यती, कुस्त्यांचे फड, तमाशे, जागरण, गोंधळ, वाघ्या-मुरळी, अंधःश्रद्धा, शेतकरी, शेतमजूर, एकमेकांचे सहकार्य, शेतीव्यवस्थेत होणारा बदल, पिठाच्या गिरण्या, विहिरीवरील इंजिन, आधुनिकतेपुढे कोसळणारा गावगाडा, नातेसंबंध, श्रेष्ठ कनिष्ठतेचा भाव, बलुतेदाराची स्थिती गती, सावकारशाही, श्रीमंत-गरीब यातील दरी, श्रीमंत महिलांची प्रतिष्ठेसाठी होणारी घुसमट, देशाच्या स्वातंत्र्याची आच, स्त्रियांचे शील, महारवाडा, मांगवाडा,



158

वेशीवरील घडामोडी अशा अनेक गोष्टींचे यथार्थ वर्णन साहित्यातून त्यांनी केले आहे. त्यांच्या साहित्याची ग्रामीण भागाशी जोडलेली नाळ स्पष्ट दिसून येते. परिसराच्या वास्तवाची मांडणी केल्याने त्यांची साहित्याची सीमा वैश्विकतेशी जोडली गेली आहे. यामुळे त्यांचे साहित्य भारतीय भाषांसोबतच जर्मन, झेक, इंग्लिश, पोलिश, रशियन, स्लोव्हाक आदि भाषांतही ते भाषांतरित झाले आहे.

मुंबईतील कामगारांचे जीवन, त्यांचे वर्गसंघर्ष, संप, तत्वज्ञान, मोर्चे, रोजीरोटीचा सवाल, कामगार चळवळीतील मतभेद या बाबतीत त्यांनी श्रीपाद अमृत डांगे यांच्या सहवासामुळे मार्क्सवादी भूमिकेतून लेखन केले आहे. तमाशाला शासनाच्या बंदीतून बाहेर काढण्यासाठी 'लोकनाट्य' ही संज्ञा वापरली आहे. शेटजीचे इलेक्शन, देशभक्त घोटाळे, माझी मुंबई, खापऱ्या चोर अशा कांही रूढ शब्दांतून लोकांसमोर वास्तव मांडले. समाजात खऱ्या अर्थाने समता प्रस्थापित करण्यासाठी अहोरात्र प्रयत्न केले. त्यासाठी त्यांनी आयुष्यभर लढा दिला. अण्णाभाऊंचे व्यक्तिमत्त्व तरल, संवेदनशील, महत्त्वाकांक्षी, जिद्दी व हरहुन्नरी होते. अण्णाभाऊंच्या साहित्यात पुरूषप्रधान नायकाप्रमाणेच स्त्री नायिकासुद्धा प्रभावीपणे उभ्या केल्या आहेत. सामाजिक बांधिलकीचे तत्त्व त्यांच्या साहित्यातून दिसते.

**माकडीचा माळ :**

रंगराव पाटील माकडवाल्याच्या दुर्गाला अडवून म्हणतो, "तुझ्यासारखी देखणी पोरगी माझ्या खोऱ्यातून सहसा सहसलामत सुटत नाही." याला प्रत्युत्तर देताना भडकून दुर्गा म्हणते, "मी गरीबाची लेक पडले, न्हाय तर मी तुला ठारचं मारलं असत." या संवादावरून स्त्रियांना दुर्बल न बनवता सक्षम बनविणे हे अण्णाभाऊंनी निर्धारित केले होते.

**कुरूप :**

अण्णाभाऊंच्या कथेतील स्त्रिया गरीब, दैन्य-दारिद्र्यात जीवन जगणाऱ्या आहेत. प्रसंगी कुलशील जपून विराट अवतार धारण करणाऱ्या, जबाबदारीने वर्तन करणाऱ्या आहेत. 'हरणा' धनाच्या धुंदीत उन्मत्त झालेला बाबा पाटील कलंकीत करू पाहतो. तेंव्हा हरणा तिचा नवरा मेल्यावर आपल्या अब्रुची धिंडवडे काढू पाहणाऱ्या बाबा पाटलाला ठार मारते.

**चिखलातील कमळ :**

यातील नायिका सुलक्षणी, कुलवंत, नैतिक व सुसंस्कारित आचरण करणारी आहेत. ती निरक्षर असूनही सुसंस्कृत आहेत. सीता खंडोबाला सोडलेली मुरळी. नाचताना सुद्धा पैशापेक्षा आपल्या शिलाला अधिक महत्त्व देते. कथेतील महादू पाटलाला बजावून सांगते, "पन्नास रूपड्यासाठी शरीराची रूमान का करू? मला त्रास देण हाच तुमचा हेतू असेल तर हे रूपये घेऊन चालते व्हा?"



**मीरा :**

मराठी प्रचलित साहित्यक्षेत्रात ही स्त्री प्रथम ठरते ती स्त्रीत्व मनात जपून न्याय व हक्कासाठी धडपडणारी आहे. समाजात ती पवित्र व सन्मानपूर्वक जीवन जगू पाहते. मीरा ही तिच्या पतीपेक्षा दिसायला खूपच सुंदर, रेखीव आहे. तिचे डोळे मादक-मोहक आहेत. यावरूनच सासू व नणंद तिचा वेळोवेळी द्वेष करतात, ती वाईट वागते असे खोटे तिच्या नवऱ्याला सांगतात. त्यामुळे तिचा नवरा तिचा छळ करतो तर दीर तिचे रूप व डोळे पाहण्यासाठी तडफडतो.

**सुलतान :**

अण्णाभाऊंच्या कथेतील प्रत्येक नायक वैफल्यग्रस्त नसून ते शूर, विजयी, स्वावलंबी, धाडसी व जगण्यासाठी नेहमी संघर्ष करणारा आहे. सुलतान बेरोजगार असून काम करण्यासाठी धडपडतो. परंतु त्याला काम मिळत नाही. आपण एखाद्या हॉटेलात काम करू, कारण या देशात गोर-गरीबांना कधीही न मिळणारे गोड पदार्थ किंवा त्याचा भूसा तरी आपल्याला खायला मिळेल, किमान खाली सांडलेले तरी खायला मिळेल ही त्याची इच्छा, पण ती कधीही पूर्ण होत नाही. शेवटी कंटाळून आत्महत्या त्याला करावी वाटते. परंतु त्याचा प्रयत्न अयशस्वी होतो. नंतर तो ठरवतो मी पोटासाठी मरणार नाही, पोटासाठी लढेन, शेवटी तो तुरूंगात तो लढतो आणि दोन भाकरी जास्त मिळवतो. दुष्काळात गरीबांना अन्न मिळत नाही, तो म्हणतो कुत्र्यासारखं जगू नका, अन्यायाचा प्रतिकार करा. मनगटावर भरोसा ठेवा. या संदेशाने गरीब माणसं पोटासाठी धडपडतात. त्याला पाहिजे ते लुटूण आणतात, दुष्काळात जगतात, मात्र त्याचवेळी उच्च समाजातील लोक त्यांच्यावर दरोडेखोर असा शिक्का मारतात. परंतु अशा लोकांची परिस्थिती ओळखायला पाहिजे, असे भाऊ सांगतात.

त्यांच्या साहित्यातून प्रचंड नीतीमत्ता आलेली आहे. एका दारूवर आधारित कथेतील दोन माणसं खूप दारू पितात. ते एकमेकांचे मेहुणे असतात. रात्रीच्या वेळी नशेत स्वतःच्या घरात न जाता एकमेकांच्या घरात जातात, परंतु दुसऱ्या दिवशी सकाळी जवळच्या तलावात चार प्रेत तरंगताना दिसतात. यावरून त्यांची पात्रे कमालीची नीतीमत्ता असल्याचे दिसून येते. अण्णाभाऊ हे खऱ्या अर्थाने प्रचंड आशावादी, अनुभवाची वास्तवतेला जोड देणारे चिंतनशील होते. त्यांनी आपल्या साहित्यामधून आशावादी भूमिका विशद केली. कष्टकरी, मजूर यांचा संघर्ष व त्यातून त्यांना मिळालेले यश भाऊंनी अधोरेखित केले.

**फकीरा :** नायक हा इंग्रजी सत्तेच्या काळात मांग-महारांना तीन वेळा हजेरी द्यावी लागायची. ही हजेरी फकीरावरही लादली होती. तेंव्हा फकीरा यास साफ नकार देतो. म्हणतो, "मी तीन वेळा हजरी का द्यायची? ही गुलामी का? मी गुलाम नाही, मी तीन वेळा हजरी देणार नाही." बाबासाहेबांनी म्हटले होते की, "गुलामाला गुलामीची जाणीव करून दिल्याशिवाय बंड करून उठत



151

ISBN : 978-81-939613-2-2

नाही." त्या विचाराप्रमाणे कादंबरीतील नायक बंड करून उठतो तो आपले कतृत्व सिद्ध करताना दिसतो. बेडस गावचा खजिना लुटायला गेल्यानंतर रघुवामनाच्या वाड्यातील स्त्रियांच्या अंगाला बोटही न लावता त्यांचा आदर करणारा फकीरा.

**वैजयंता :**

कादंबरीच्या प्रस्तावनेत मी जनतेची कदर करणारा कलावंत आहे. माझा माझ्या देशावर व जनतेवर तिच्या संघर्षावर प्रचंड विश्वास आहे. देश सुखी समृद्ध व्हावा, इथे समता नांदावी, अशी स्वप्ने मला रोज पडतात, ती पाहत पाहत लिहितो. सत्य हदयाने लिहावे लागते. दलितांचे जीवन तितक्याच प्रामाणिक व निष्ठेने चित्रित करणार आहे अशी भूमिका विशद केली.

**वैर :**

यात जुन्या चालीरीती दूर करण्यात लोप पावलेल्या प्रगत प्रथांना पुढे आणावे, महाराष्ट्रात नवसमाजनिर्मिती व्हावी, प्रेम सलोखा नांदावा, जनता सुखी व्हावी, सर्वत्र समाजवादाची संकल्पना पहावयास मिळावी.

**आवडी :**

प्रस्तुत कादंबरी वास्तवावर आधारित असून सातारा परिसरात शिवाजी महाविद्यालयात आपल्या साहित्याची प्रेरणा विशद करताना त्यामागील कथानक उलगडून दाखविले होते. गाठी मारणे व सोडणे हा माझा परंपरागत धंदा नाही, मी पुरोहित नाही, आम्ही आपलं काम फडक्यांकडे सोपवून दिले आहे. मी जन्माने मांग असून माझ्याकडे वास्तव जीवनानुभवाच्या कथा, व्यथांचा वेदना, इर्षा, संघर्ष, दलित कष्टकऱ्यांचा जीवन संघर्ष यांचा भरपूर साठा आहे.

या छळाच्या आगीत ती उभी राहते. तरीपण ती आत्महत्या न करता स्वतःचे डोळे फोडून घेते आणि सर्व स्त्रियांना ती नैतिकतेची शिकवण देते.

**वैजयंता :**

स्त्री ही उपभोगाची वस्तू किंवा सौंदर्याची वस्तू व पुरूषांची गुलाम नाही, तर ती अप्रतिम बाणेदार, करारी, शूर व नीतीमान आहे. वैजयंता एक तमासगीर कलावंत, पैसा-प्रतिष्ठा-प्रसिद्धी अमाप. खुंदलापूर यात्रेत दोन तमाशाची जुगलबंदी लावण्यासाठी आबा पाटील, उमाचंद्र व वैजू परसू असे दोन तमासे फड बोलवतो. याच प्रसंगी एक वैजयंतावर एकतर्फी प्रेम करणारा चंदूलाल वैजयंताचे नाक कापण्याची प्रतिज्ञा करून तेथे येतो. आबा पाटलाच्या वाड्यातच वैजयंताला गाठून तिचे नाक कापून वलात्कार करून तिच्यावर अत्याचार करण्याच्या उद्देशाने तिच्यावर चाल करतो. त्याचवेळी वैजयंता त्याला उग्र रूपाने प्रत्युत्तर देते. हे सर्व चित्र पाहून तेथे असलेला चंदूलाल तिला स्पर्श न करताच निघून जातो. या कादंबरीत तमासगीरावरील संकटे, त्यांचे एकूण जीवनमान व येणारी अनेक संकटे याचे दर्शन प्रकर्षाने घडविले आहे. प्रस्तावनेत जो कलावंत जनतेची कदर करीत असतो, ती जनता त्या कलावंताची कदर करते.



ISBN : 978-81-939613-2-2

**पिराजीची भानगड :**

अण्णाभाऊंच सुंदर जग निर्माण करण्याच्या स्वप्नावर आधारित कथानक, ते आपल्या पत्राद्वारे पटवून घेतात. पण संपूर्ण जगभराच्या वृत्तपत्रातील पहिले पान बातम्या, दंगल, संप, आंदोलने, मोर्चा, खून, खराबा, चोरी, फाशी, आत्महत्या, बलात्कार, शिरजोरी अशा अनेक बातम्या सतत येतात. सामान्य माणूस भेदरलेल्या अवस्थेत जीव मुठीत घेऊन जगत आहे. जीवनावश्यक वस्तूच्या किंमती गगनाला भिडल्या आहेत. गरीब श्रीमंतीची दरी वाढतच चालली आहे. दोनवेळा हाता-तोंडाची भेट होण्यासाठी उघडी-नागडी पोरं उकीरड्यावर कागद वेचत आहेत. दुर्गंधी शेजारी बसून कसलेतरी अन्न खाताना दिसतात. तात्पुरत्या प्लास्टीकच्या निवाऱ्याखाली नवजात बालकाला मायेने स्तनपान करणारी आई, पोटाच्या खळगीसाठी आपली अब्रु विकणारी अबला, जीवाच्या आकांताने औषध मिळत नसल्याने विव्हळणारे अनेक लोक? ही लोक जगत तरी कशी व का? अशा अनेक प्रश्नांची काहूर मनात निर्माण होतात. यावरच अण्णाभाऊंनी कितीतरी वर्षापूर्वी चिंतन केल आहे. एकीकडे २४ तास एसी मध्ये राहणारी माणसं पिझ्झा, बर्गर खाणारी प्रचंड गर्भश्रीमंत असणारी तर दुसरीकडे जगण्यासाठी संघर्ष करणारी माणसं यावर चिंतन केले आहे.

अण्णा भाऊ साठे नंतरच्या काळात ते एकाकी पडले, सतत लिहित राहिले. उपवास काढत राहिले, अर्धपोटी दिवस काढत होते. आपल्या सोबत असलेल्या विविध संबंधाने एकत्रित जमलेल्या भूतावळीने त्यांना अक्षरशः नागविले. दरम्यानच्या काळात भाऊंची प्रकृती खुप बिघडली व सर्व लोक दुरावली गेली. शासनाने ३५० रूपये मासिक मानधन दिले. समाजकल्याणकडून मिळालेला फ्लॅट दिला. अण्णा भाऊ साठे यांचे जगण व वागणं यात अंतर नव्हते. या संदर्भात एक आठवण कै. श्रीकृष्ण पोवळे यांनी सांगितली, ती अशी, "अण्णाभाऊंनी आपली प्रसिद्ध कादंबरी केवळ दोनशे रूपयांना विकली. त्यापैकी शंभर रूपये रोख मिळाले. त्यातील २५ रूपये त्याचवेळी त्या दोघांच्या जेवणासाठी खर्च केले." दोन दिवस शाळेत गेलेल्या अण्णाभाऊंनी मॅक्झिम गॉर्की वाचून त्याला आपले प्रोत्साहन मानले. मानवी जीवनाच्या सर्व अंगानी विचार करणाऱ्या, सातत्याने जीवनाविषयी सकारात्मक भूमिका विशद करणाऱ्या साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांचे रविवार १८ जुलै १९६९ रोजी निधन झाले. मराठी सारस्वतातील एका प्रतिभासंपन्न कलावंताचा अंत झाला.

**निष्कर्ष व समारोप :**

अण्णा भाऊ साठे समग्र साहित्य अनुभवाच्या मुसेतून तयार झाले आहे. कथा, कादंबरी, नाटक, प्रवासवर्णन, गीत, शाहिरी, लोकनाट्य, चित्रपटकथा अशा विविध साहित्यप्रकारात लेखन करणारे साहित्यिक म्हणून त्यांचा उल्लेख करावा लागतो. विषमतायुक्त समाज, गोर-गरीब, दीन-दलित अशा बहुजन वर्गाचे कैवारी, त्यांचे दुःख म्हणजेच उपेक्षितांचे अंतरंग खऱ्या अर्थाने आपल्या लेखणीद्वारे चित्रित केले. महात्मा फुले, राजर्षी शाहु महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे,



Scanned with OKEN Scanner

ISBN : 978-81-939613-2-2

मानवी कल्याणाचे ते अनुयायी ठरतात. विश्व मानवतावादी दृष्टीकोन त्यांच्या सर्वच कलाकृतीतून व्यक्त होतो. पारंपारिक विचार, श्रद्धा, समजुतींना फाटा देऊन नवविचार प्रबोधनात्मक मूल्यांचा उद्घोष, मार्क्सवादी विचारसरणीचा आम्ही पुरस्कार व मानवतावादी बहुजनहिताय बहुजनसुखाय संकल्पना त्यांच्या साहित्यातून आलेली दिसते. महात्मा फुले यांच्या सत्यशोधक जलशांनी जे कार्य वैचारिक जाणीवांच्या माध्यमातून घडवून आणली, तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आंबेडकरी विचारधारेने २० व्या शतकात सामाजिक चळवळीच्या माध्यमातून केले तेच चळवळीचे कार्य अण्णाभाऊंच्या लोकनाट्यांनी केले आहे. औपचारिक शिक्षणाची कुठलीही पूर्वपरंपरा नसताना उपेक्षित समाजस्तरात जन्म घेऊन स्वयंप्रेरणेने स्वतःस घडविणाऱ्या व सर्वप्रकारच्या जीवन संघर्षास तोंड देत साहित्य क्षेत्रात आपली नाममुद्रा उमटविणारे लक्षणीय चिंतनशील साहित्यिक म्हणून अण्णा भाऊ साठे यांचा उल्लेख करावा लागतो.

**संदर्भ :**

१. समाधान तुकाराम वाणी (संपा.), सत्यशोधक दर्पण, विशेषांक-२०१८, सिडको औरंगाबाद.
२. डॉ. जनार्धन वाघमारे, विचारशलाका, प्रकाशक नागोराव कुंभार, साठे विशेषांक, डिसेंबर १९९२.
३. भंडारे डी. बी., साहित्यिक अण्णाभाऊ साठे, नंदिग्राम मासिक, जि. प. प्रकाशन नांदेड, १९९३
४. डॉ. शिवाजी जवळगेकर (संपा.), जननायक अण्णाभाऊ साठे, २००७, साहित्यभूषण अण्णा भाऊ साठे कला अकादमी व संशोधन केंद्र लातूर.





# सांख्य तत्वज्ञान (सत्ताशास्त्रीय दृष्टीकोन)

डॉ. आंबटकर वृषाली ओंकार
श्री गुरुबुध्दि स्वामी महाविद्यालय, पूर्णा

**प्रस्तावना :–**

व्यक्तीची खरी ओळख ज्याने होते ते ज्ञान होय. अंतीम सत्य अंतीम तत्व या सर्वाचा अभ्यास तत्वज्ञानाच्या क्षेत्रात केला जातो. तत्व अंतीम आदम जे ते तत्व या जिज्ञासूपक मनुष्याचे वैशिष्टय आहे. याच आधारावर तो अनेक प्रश्नांची उकल करण्याचा प्रयत्न करत असतो. जिज्ञासू वृत्तीमुळे मनुष्याला सातत्याने काही प्रश्न उद्‌भवत असतात. यामध्ये मनुष्याला विश्वअस्तित्वाच्या अनुशंगाने प्रश्न पडतात. आणि या सारख्या प्रश्नांची उकल केवळ तत्वज्ञानाच्या क्षेत्रात करण्याचा प्रयत्न केला जातो. हा प्रयत्न तत्वज्ञानाच्या त्या भागात केला जातो त्याला सत्ताशास्त्र असे म्हणतात.

अभ्यासाच्या सोयीकरीता तत्वज्ञानाची दोन विभागात विभागणी केली आहे. ती म्हणजे भारतीय पाश्चात्य दर्शन अशी होय. संपूर्ण तत्वज्ञानाचे अंतीम उद्दीष्ट हे आहे कि अंतीम तत्वांचा किंवा आदय तत्वांचा शोध घेणे होय. या मध्ये भारतीय तत्वज्ञानाचा देखील समावेश होतो. सांख्य तत्वज्ञानाने आपल्या सत्ताशास्त्रीय सिध्दांताच्या आधारावर संपूर्ण तत्वज्ञानाची उभारणी केली आहे.

**भारतीय तत्वज्ञाने :–**

अस्तीक तत्वज्ञान :–यामध्ये प्रदर्शनाचा समावेश होतो जे तत्वज्ञान वेदांचे प्रामाण्य व इश्वराचे अस्तीत्व मानले ते अस्तीक दर्शन होय.

नास्तीक दर्शन :– ज्यांना वेदत्व प्रमाण्य मान्य ते नास्तीक होय. यात केवळ तीन दर्शनांचा समावेश होतो. ते म्हणजे बौध्द , पार्वीक, जैन हे होय.

**गृहितके**

1 भारतीय तत्वज्ञानातील षडतत्वज्ञानात सांख्य तत्वज्ञान आहे.
2 सांख्य तत्वज्ञानाने विश्वाच्या बुडाशी असणाऱ्या आदय तत्वांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

2019-20

Marathwada Shikshan Prasarak Mandal's

# R. B. Attal Arts, Science & Commerce College

Georai Tq.Georai Dist.Beed


# Souvenier cum Abstract Book

## National Conference

on

## Emerging Trends and Challenges in Biosciences

**Bioscience**





Scanned with OKEN Scanner

# Synthesis and Study of $Ni^{2+}$ substituted Mg-Cu-Zn ferrite Nanomaterials by molten salt method

L.M. Thorat[1], S. R. Kamble[2], S. V. Mahajan[3].

[1]Department of Electronics, S. M. Dnandeo Mohekar Mahavidyalaya, Kallam, Dist-Osmanabad

[2]Department of Physics, S. M. Dnandeo Mohekar Mahavidyalaya, Kallam, Dist-Osmanabad

[3]Department of Physics, S. M. Dnandeo Mohekar Mahavidyalaya, Kallam, Dist-Osmanabad, State- Maharashtra, Country- India.

Corresponding Authors: Dr. L. M. Thorat, Email: lankeshwarthorat@gmail.com

**ABSTRACT:**

Spinel ferrites with general chemical formula $Mg_{0.25-x}Ni_xCu_{0.25}Zn_{0.5}Fe_2O_4$ where x=0.0 to 0.25 in step 0.05. Were prepared by molten salt method. The effect of substitution of Ni2+on structural and microstructural properties of Mg-Cu-Zn ferritehave been studied.for the use in multilayer chip inductor(MLCI) applications.

The lattice parameter shows a gradually increased values with increasing $Ni^{2+}$ content, which is attributed to larger ionic size of $Ni^{2+}$(o.69 $^0$A) which replaces $Mg^{2+}$(0.65 $^0$A). The crystallite size has been estimated by the Deby-Scherrer formula using the full width at half-maximum (FWHM) of the line broadening of the (311) reflection and it is found to be in the range of (45-49nm). The grain size determined from Scanning electron microscope (SEM).The dense micro structure is observed with the average grain size of 0.91-1.03μm. The chemical compositions of present systems have been calculated by Energy Dispersive Spectrum(EDS). With improvement in the values of the above-mentioned properties, the synthesized materials could be suitable for potential application in some magnetic and microwave devices.

***Key words:Mg-Cu-Zn ferrite,XRD,*** SEM,EDS.



Scanned with OKEN Scanner

# पंचधारा

वर्ष : ६२ वे  अंक : तिसरा
ऑक्टोबर ते डिसेंबर २०१९



मैं ना हिंदू मैं ना मुस्लमां
शाद का मजहब शाद ही जाने

निजामाचे पंतप्रधान व चतुरस्त्र लेखक महाराजा किशनप्रसाद

मराठी साहित्य परिषद, तेलंगण राज्य, हैदराबाद
RNI Regd. No.32307/79  मूल्य : ४५ रुपये

Scanned with OKEN Scanner

कार्यवाह
म.सा.प. तेलंगण राज्य
४-६-४५८, इसामिया बाजार, हैदराबाद - ५०० ०२७.
दूरध्वनी : (०४०) २४६५७०६३, भ्रमणध्वनी : ७८४२८५३९८४
mspaphyd@gmail.com

प्रकाशक
डॉ. विद्या देवधर

सर्व हक्क - म. सा. प. तेलंगण राज्य.

या अंकात प्रकट झालेल्या मतांशी संपादक-मंडळ सहमत असेलच असे नाही. फक्त एक व तीन वर्षाची वर्गणी स्वीकारली जाईल. दोन वर्षाची प्रथा स्थगित करण्यात आली आहे. पंचधारेच्या आर्थिक व्यवहाराचे वर्ष एप्रिल ते मार्च असे आहे.

सर्व सभासदांनी आपले E-mail ID फोन नंबर पुढील क्रमांकावर पाठवावेत -
7842853984

पंचधारा वर्गणी **Marathi Sahitya Parishad**
**IDBI BANK, Kachiguda Branch**
**A/c. No.59410010000125** किंवा
**Panchdhara**
**A/c. No.59410010001359, IFSC Code - IBKL0000594**
**(For both account)**
या खात्यावर जमा करावी. मनीऑर्डर पाठवू नये.

वार्षिक वर्गणी रु.२००/-
तीन वर्षाची एकत्र वर्गणी रु.५००/-
आजीव सदस्य वर्गणी रु.२,०००/-
(वर्गणी शक्यतो डी.डी.ने पाठवावी)
(बाहेरगावचा चेक असल्यास वटणावळीचे रु.३५/- अधिक पाठवावेत, ही विनंती)
वार्षिक वर्गणी रु.२००/-
**या अंकाचे मूल्य : रु. ४५/-**
टपाल खर्च रु.२५/-
मुखपृष्ठ संकल्पना : श्री. माधव रामराजे चौसाळकर

मुद्रक
आनंद लाटकर
कॉम्प-प्रिंट कल्पना प्रा. लि. ४६१/४ शिव-पार्वती टिळक रस्ता, पुणे - ४११ ०३०.
फोन : (०२०) २४४७७५२७

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखांशी विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

Scanned with OKEN Scanner

# अनुक्रमणिका


संपादकीय ........ ४

श्रद्धांजली : गिरीजा कीर - प्रिया धारूरकर ........ ६

१. अखिल भारतीय म. सा. महामंडळ : वर्धापन दिन ........ १०

**१. भाषण- रंगनाथ पठारे** ........ १२

**२. समारोप - कौतिकराव ठाले पाटील** ........ १५

**३. पुस्तक प्रकाशन - प्रास्ताविक : डॉ. शोभ शास्त्री** ........ १७

**४. ग्रंथपरिचय- डॉ. शशी मुदीराज** ........ १८

**४. भाषण- प्रफुल्ल शिलेदार** ........ २१

**५. भूमिका- डॉ. विद्या देवधर** ........ २२

**६. मनोगत- डॉ. माया देवी** ........ २४

२. डॉ. सुधीर रसाळ- व्यासंगी आणि परखड समीक्षक
**प्रशांत गौतम** ........ २५

३. शिवकालीन राष्ट्रीय कवी भूषण
**डॉ. गीता काटे** ........ ३०

४. महाराजा सर किशन प्रसाद : चतुरस्त्र प्रतिभावंत
**आनंदराज वर्मा, अनुवाद- विद्या मक्तल** ........ ४३

५. साहित्यिक अध्यात्मिक महामेरू डॉ. रंगनाथ सिद्धयोगी जगद्गुरू
**वैशाली सुनिल पटवर्धन** ........ ७३

६. मराठवाड्याचे पहिले कादंबरीकार- डॉ. वा.दा. गाळगीळ
**श्री. यादवराव कंदकूर्तीकर** ........ ८३

**ग्रंथपरीक्षणे**

७. लखलखती सौदामिनी
**आरती देवगावकर** ........ ८७

८. 'बहुस्तरीय जीवनानुभवाचा चिंतनगर्भ ललितमेळा'
**केदार काळवणे** ........ ९६

९. लेखक परिचय ........ १०२

१०. स्वागत नव्या पुस्तकांचे ........ १०४


Scanned with OKEN Scanner

# बहुस्वरीय जीवनानुभवाचा चिंतनगर्भ ललितमेळा

केदार काळवणे

दासू वैद्य हे नव्वदोत्तर काळातील भवतालातल्या विसंगतीला उपरोधशैलीच्या माध्यमातून काव्यबद्ध करणारे चिंतनशील मानवतावादी कवी आहेत. 'तूर्तास' आणि 'तत्पूर्वी' या त्यांच्या दोन प्रसिद्ध काव्यसंग्रहांची शीर्षके कालवाचक आहेत. त्यातून या कवितेला काळभान असल्याचे ध्वनित होते. या संग्रहातून वैद्य यांनी आपल्या काळातील उलथालीकडे तिरकसदृष्टीतून पहात व्यक्त केलेला आशय अर्थवलयी आहे. सामाजिक वास्तवाला विरोधन्यास आणि विपरीतताभाव यांच्या वापरातून व्यंजना घडवत प्रतिसाद देणारे कवी म्हणून त्यांचे वेगळेपण अधोरेखित करता येईल. या कारणानेच समकालीन मराठी कवितेत त्यांची कविता स्वतःचा चेहरा घेऊन अवतरते. गाव-खेड्यापासून ते महानगरापर्यंतचे मोठे अवकाशविश्व या कवितेने व्यापलेले आहे. नागरी-अर्धनागरी-ग्रामीण अशा सांध्यावरील मध्यमवर्गीय आणि सर्वसामान्य माणसांच्या काळसंदर्भी जीवनजाणीवांना-जीवनरीतीला ते साक्षात करतात. माणूस, समाज आणि निसर्ग हे त्यांच्या कवितेचे निर्मीणकेंद्र आहे. सांस्कृतिक संचिताच्या संस्कारशीलतेने भारलेली त्यांची कविता मानवी वर्तनकृतींचा शोध घेते. परंपरा आणि आधुनिकतेच्या संक्रमणातून आकारलेल्या वर्तमानिक जगाचा वेध घेत सामान्य माणसांच्या जगण्यातील विविध परिमाणांना अभिव्यक्त करते. वैयक्तिक-सामाजिक अनुभूतीविश्वाला नव्या प्रतिकव्यवस्थेच्या उपयोजनातून त्यांनी अनेकार्थक्षम बनवलेले आहे. म्हणूनच समकालीन कवितेत ही कविता स्वतःचे अस्तित्व ठळक करते.

कवितेप्रमाणेच दासू वैद्य यांनी सामर्थ्यशील असे ललितगद्यलेखनही केले आहे. त्यांच्या काव्यप्रकृतीची छाप त्यांनी केलेल्या ललित गद्यलेखनावर आहे. 'आजूबाजूला' आणि 'मेळा' हे त्यांचे दोन ललितलेखसंग्रह याची साक्ष देतात. 'मेळा'तील लेखन काव्य आणि गद्य यांच्या सीमारेषा पुसट करत समकालाला भिडणारे आणि त्यांच्याच लेखनात सर्वोत्तम ठरणारे असे लेखन आहे. समकाळातील गुंतागुंतीचे सामाजिक वास्तव आणि त्याच्या परिणामातून आकारलेल्या सृष्टीचा संवेदनशील दृष्टीने घेतलेला अर्थपूर्ण



Scanned with OKEN Scanner

शोध म्हणजे हे लेखन आहे. मानवी जीवनाचा विविध कोनांतून घेतलेला चिंतनगर्भ तळशोध म्हणूनही या लेखनाकडे पाहता येईल. यात सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, पर्यावरणीय अवकाशातील घटितांची सारसूत्रे आणि व्यक्ती-समूहांच्या विविध वृत्ती-प्रवृत्ती, विचार, भावना, मूल्यकल्पना, नीती-अनितीचा वैविध्यपूर्ण कोलाजी आविष्कार आहे. शेती, दुष्काळ, पाणी, भाषा, शिक्षण, धर्म, कला, निसर्ग, ज्ञान-विज्ञान अशा सर्वस्पर्शी जाणीवक्षेत्राला कवेत घेत हा चिंतनमेळा साकारतो. या जाणीवक्षेत्रातून सूक्ष्म अनुभूतीचे विविधांगी पदर साक्षात झालेले आहेत. इतिहास-वर्तमानाच्या संघर्षशील काळभानाचे आणि बदलत्या समाजवास्तवाच्या ताण्याबाण्याचे परिप्रेक्ष या लेखनाला लाभलेले आहे. हा गेल्या अर्धशतकाच्या भवतालात दडलेल्या बहुस्वरीय आवाजांचा अर्करूपी ललितमेळा आणि सामाजिक स्थित्यंतराच्या बहुपरिणामी पडसादाचा आरसा आहे. हे स्वरपरिणाम महाराष्ट्रीय ग्राम-नागर जगण्याच्या अनुभवविश्वाने समृद्ध झालेले आहेत. या आवाजांची तात्कालिकता गळून पडत त्याला वैश्विकता प्राप्त झालेली आहे. समकालीनता आणि कालातीतता हा महत्त्वाचा गुणधर्म या लेखनाचा आहे. समाजातील सर्वस्तरीय वाचकांना आकलन होईल अशा सुलभ सर्वपरिचित समाजभाषेचे उपयोजन आणि लालित्याचा तोल ढळू न देता वाङ्मयीन कसोटीवरही श्रेष्ठ ठरण्याची क्षमता बाळगून असलेली लेखनशैली यामुळे या लेखनाला महत्त्व प्राप्त होते.

वैयक्तिक-सामूहिक अनुभवांच्या या अठ्ठावीस लेखांच्या संग्रहातून सांस्कृतिक संदर्भ उजागर होत समकालीन प्रश्न, सामाजिक वास्तव आणि काळवास्तवाचे प्रकटीकरण होते. निसर्ग जाणीवेचे संवेदन आणि अस्तित्वविषयक जीवनचिंतनही यातून ध्वनित झाले आहे. सांस्कृतिक संचिताचा खोलवर ठसा या लेखनावर आहे. देशी-विदेशी, ग्राम-नागर, आजचे-कालचे असे विविध सांस्कृतिक संदर्भ या लेखनातून उजागर होतात. सांस्कृतिक चलनवलनाचा खोलवर ठसा या लेखनावर आहे. त्यातून भौतिक-अभौतिक जगण्याच्या परिभाषेचा सांस्कृतिक इतिहासच ग्रंथबद्ध झाला आहे. 'रंग, कटिंग, श्वानपुराण, अरण्यरुदंन, पिक्चर, मनातलं घर' हे लेख यासंबंधी महत्त्वाचे आहेत. समकाल नासवणाऱ्या आणि जगण्याची मुक्त गती अवरुद्ध करणाऱ्या कळीच्या ठरलेल्या समकालीन प्रश्नांविषयीची समाजहितैषी आशयभाष्य अत्यंत कलात्मकरीतीने या लेखनात येतात. या आशयभाष्यातून वैद्य यांची सामाजिक बांधिलकी आणि परिपक्व वैचारिक पिंडभानाची दिशाही ध्वनित होते. 'गळा दाबल्याने गाणे अडते का ?, मार्गदर्शन, न पाठवलेलं पत्र, लांब नाकवाल्याची गोष्ट' या लेखांतून आलेली समाजचिंता आणि चिंतन सर्वांनाच



Scanned with OKEN Scanner

अंतर्मुख करायला लावणारे आहे. यातून घडलेले विचारदर्शन समाजाचे विचारप्रवर्तन करणारे आणि दिशादर्शक ठरणारे आहे.

समाजप्रश्नांबरोबरच सबंध समाजाला वेढून असलेल्या आणि समूहांच्या सलोखामय-नितीमान जगण्याला पोखरणाऱ्या समाजवास्तवाची प्रखर जाणीव संयतपणे या लेखनातून व्यक्त होते. या वास्तवाला भूत-वर्तमानाचे संदर्भ लगडलेले आहेत. 'सीमेवरचं नाटक, बाई संभाळ कोंदण, अंधारातला नट, अरं...येऊऽऽऽन येऽऽऽ न येणार कोण ?, खडूची भुकटी, निघून गेला आहे...' या लेखांचा निर्देश या संदर्भात करता येईल. त्या-त्या काळाचे स्वत:चे असे वास्तव असते. त्या वास्तवाने त्या काळाचा चेहरा स्पष्ट केलेला असतो. या वास्तवाने काळाच्या वाटचालीलाही चांगले-वाईट वळण दिलेले असते. जगण्यातील सुरूप आणि कुरूप बाबींनी हे वास्तव आकाराला येते. दासू वैद्य यांनी कुरूप काळवास्तवाला 'बाजार, झेंडे, गोष्ट लिहिणाऱ्याची गोष्ट, अंथरलेली वाळू, बक्षिशी, रास्ता रोको' या लेखांतून मुखरित केले आहे. जीवनाचे क्षणभंगुरत्व अधोरेखित करत त्याचे मर्म आणि अंतिम सत्यार्थाबद्दलचे सखोल जीवनचिंतन दासू वैद्य यांच्या लेखनातून येते. माणसाची जीवनाबद्दलची आसक्ती, जीवनमरणाच्या अंतरायातील आशा-आकांक्षा आणि आयुष्याचे गमक या चिंतनातून उलगडते. यादृष्टीने त्यांच्या 'मरणगंध, पोळणारी सावली, लाल पोशाखातला हिरवा माणूस, पाठलाग आणि प्राप्ती' या लेखांचा निर्देश करता येईल. निसर्गाचे सजग-सशक्त भान म्हणून 'उगवून आलेलं...' व 'रे पावसा...' हे लेख लक्षणीय आहेत. यातून उजागर झालेले निसर्गभान आपल्या मूळ आदिम चैतन्यमयी शाश्वत जगण्याचा साक्षात्कार घडवणारे आहे.

'मेळा' मधून अधोरेखित झालेले संदर्भ, प्रश्न, वास्तव आणि जाणीवेचा स्थूलपणे निर्देश करणे आवश्यक ठरेल. त्यातून या लेखनाची आशयसूत्रे लक्षात येतील. केस कापण्याच्या प्रथेला असणारे विविध संदर्भ, रंगांना प्राप्त झालेले देश-काल चौकटीतील सामाजिक-सांस्कृतिक अर्थ, स्त्री-शोषणाची पारंपारिकता, तिच्याबद्दलची पुरुष मानसिकता आणि स्त्रीवर्गाचा संपूर्ण पुरुषावर असलेल्या अविश्वासाचे सार्वत्रिक दर्शन या लेखनातून घडते. 'कितीतरी वर्षांपासून शेतकरी आत्महत्या करतायत. मायबाप सरकारही लाख लाख रूपयांची बक्षिसी न थकता वाटतंय. तुम्ही आंब्याच्या झाडाला फास घ्या किंवा बाभळीच्या झाडाला लटकवून घ्या किंवा विषारी औषध गटागटा पिऊन मरा, सरकार भेदभाव करणार नाही.' (पृ.१०८) हे शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे गेल्या पाव शतकातील वास्तव आणि राजकारण्यांची त्याकडे बघण्याची असंवेदनशील-उपचारात्मक

वृत्ती, पाणी आणि पाण्याने उभा केलेला रणसंग्राम, त्यामुळे खेड्यांची झालेली आबाळ, दुष्काळ आणि त्यामुळे खेड्याची झालेली वाताहत याचे प्रत्ययकारी चित्र यातून उमटले आहे. निवडणुकांमधे तीच-तीच दिली जाणारी आश्वासने, राजकारणाचा मूल्यांकडून मूल्य ऱ्हासाकडे झालेला प्रवास, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, विचारवंत-लेखकांचे खून, शिक्षणातील अपप्रवृत्ती, कॉपीचे वास्तव, भाषेचा प्रश्न आणि भाषिक मानसिकता, वाहिन्यांची टीआरपीसाठी चाललेली स्पर्धा आदी विषयांच्या अनुषंगाने दासू वैद्य यांनी केलेले मुक्तचिंतन मूलगामी स्वरूपाचे आहे.

भारतीय सैनिक व भारत-पाक यांच्यातील तणाव आणि भारतीयांची मानसिकता, जात-धर्माच्या प्रतीकांनी समाजात निर्मिलेली दहशत-भीती, महापुरुषांच्या झालेल्या वाटण्या आणि त्यांचे केलेले प्रतिमानिश्चितीकरण, समाजातील कर्मकांडे आणि त्याची चिकित्सा, पोकळ-दांभिक-कुचकामी सामाजविकासातील फोलपणा, लेखकाची सामाजिक बांधिलकी आणि व्यवस्थाशरणता, भांडवलीकरणाच्या परिणामातून उदयाला आलेली मॉलसंस्कृती आणि त्यातील शुष्कता, माणसांच्या जगण्यातून हरवलेली निरागसता-नैसर्गिकता, त्याला आलेला कोरडेपणा-कोडगेपणा नि कृत्रिमता, गाव-शहरांना प्राप्त झालेले बटबटीत स्वरूप अशा भवतालात साठलेल्या बहुपरिणामी आशयरूपांना हे लेखन मुखरित करते. यासोबतच 'मरणाला सामोरं जावं लागतं, तसंच समोरच्याचं नसणं निमूट स्वीकारावं लागतंच. गेलेल्या व्यक्तीशी जोडून घेण्याचा आपला हट्ट सुरू असतो. बऱ्याचदा तर गेलेल्या व्यक्तीला अनेक जण हमखास आदल्या दिवशी भेटलेले किंवा बोललेले असतात. मृत व्यक्तीने मरणापूर्वी बोललेल्या शब्दांना, केलेल्या कृतीला नंतर मरणगंध जोडला जातो.' (पृ.३६-३७) या प्रकारचे मृत्यूसंबंधीचे चिरकाल सत्य आणि वैश्विक जीवनचिंतनही यातून येते. समाजातील समूह संघर्ष, निसर्ग सौंदर्य व त्याचा ऱ्हास, लहान मुलांमधील निरागसता, मोर्चे, आंदोलने, चित्रपट, प्राणी, घर आणि आयुष्य या अनुषंगाने आलेली चिंतनरूपे मूल्यगर्भी आहेत.

शीर्षकातील प्रतीकात्मकता, अनुभव मांडणीच्या वैशिष्ट्यपूर्ण पद्धतीमुळे निर्माण होणारे कुतूहल, रूपकाचा केलेला समर्पक वापर, काव्यमय प्रभाविता, कथनात्मक प्रवाही निवेदनशैली, आत्मकथनप्रधान विषयरचना, चित्रात्मकता आणि दृश्यात्मकतेची येणारी प्रचिती, उपरोधातून केलेली समाजटीका, संवादात्मकता आणि वैचारिकता या आविष्कार विशेषांच्या सेंद्रिय एकात्मतेतून या प्रत्येक लेखाचा घाट तयार झालेला आहे. या घाटाच्या संरचनेत घोषवाक्य, म्हणी, वाक्यप्रचार, काव्य ओळी, गोष्टी, घटना-



Scanned with OKEN Scanner

प्रसंग, व्यक्तिचित्रे, आठवरूपे, जातककथा, कथा-कादंबरी- चित्रपटातील प्रसंग, गाणी, पत्र, लोकवाङ्मय यांचे नेमके उपयोजन केल्यामुळे या लेखनाचा आकृतिबंध एकसंध बनत आशय अर्थवाही झालेला आहे. अभिव्यक्तीच्या सर्व क्षमताशक्यता पणाला लावत ही साहित्यकृती सिद्ध आहे. "वाढलेल्या काजळीने, ज्योत विझते का ? /गळा दाबल्याने, गाणे अडते का?" (पृ. १०) या सांगण्याच्या अतीव ऊर्मीतून आणि भूमिकेतून ही पोतरचना तयार झालेली आहे. त्यामुळे हे लेखन वैशिष्ट्यपूर्ण झालेले आहे. म्हणूनच वैविध्यपूर्ण अनुभवाचे संश्लेषित सारसूत्र या संग्रहातील प्रत्येक लेखातून जिवंतपणाने साक्षात झालेले आहे. त्यामुळेच भावना-विचार-कल्पना यांच्या नितळ अभिव्यक्तीतून साकारलेला हा प्रत्येक लेख म्हणजे जीवनानुभव रंगाचे शब्दचित्र वाटतो.

जगण्यातल्या साध्या साध्या अनुभवरूपांची सांदेजोड करत अर्थवलयी कलारूप देण्याची वैशिष्ट्यपूर्ण हातोटी दासू वैद्य यांच्याकडे आहे. वास्तव आणि कल्पितासह सूक्ष्म निरीक्षणांना सर्जनबद्ध करत तरल अनुभूतीची प्रचिती देणारे अनोखे कसबही त्यांच्याकडे आहे. समाजवास्तवाची सखोल मीमांसा आणि त्याला असणाऱ्या विविध बाजूंचा सम्यक् आविष्कार वाचकांचे वैचारिक भरणपोषण करणारा आहे. या संग्रहातील लेखांतून आलेल्या व्यक्तींना त्यांच्या व्यक्तिमत्त्वांच्या स्वभावविशेषांसह आहे तसे रेखीवपणे सजीव करणारी व्यक्तीचित्ररेखाटनाची खास शैली दासू वैद्य यांच्याकडे आहे. उदाहरणादाखल श्रीनिवासन, कोंडबामामा, रामकाका या व्यक्तिचित्रांचा यानिमिताने निर्देश करता येईल. 'स्व' जाणिवेला सामूहिकतेत परावर्तित करणाऱ्या सामाजिक वेदना-संवेदनांचा भावनालेख म्हणूनही या लेखनाची महत्ता अधोरेखित करता येईल. समाज स्पंदनांना शब्दरूप देताना त्यांनी केलेले जीवनभाष्य वाचकांना आत्मशोधाच्या दिशेने घेऊन जाणारे आहेत. साहित्याच्या विविध प्रकृतिधर्मांना-प्रकारघटकांना आणि भाषिक वैशिष्ट्यांना रिचवत आकार पावलेला हा बहुस्वरीय जीवनानुभवाचा चिंतनगर्भ शैलीदार ललितमेळा मराठी ललितगद्यात अक्षर ठरणारा आणि नव्वदोत्तर मराठी ललितगद्यलेखन वाङ्मयप्रकाराचा रूपविस्तार करणारा आहे.

मागील दोनशे वर्षांतील या वाङ्मयप्रकाराचा प्रवास गुजगोष्ट, लघुनिबंध, ललितनिबंध, ललितलेखन, ललितगद्य ते मुक्तगद्य असा झालेला आहे. प्रामुख्याने आठवणी, अनुभवरूपे, शब्दचित्रे, व्यक्तीचित्रे, रोजनिशी, प्रवासलेख यांचा अंतर्भाव यात केला जातो. निबंध, कथा, कविता, आत्मचरित्र आणि नाटक या वाङ्मयप्रकाराची स्वरूपवैशिष्ट्ये रिचवत आकाराला आलेला हा वाङ्मयप्रकार मुक्तबंध स्वरूपाचा आहे. विषय-मांडणीचे कोणतेही



Scanned with OKEN Scanner

बंधन नसलेल्या या फॉर्मला म्हणूनच 'फॉर्मलेस फॉर्म' असे म्हटले जाते. वैचारिकता, माहितीचे प्रकटीकरण आणि लालित्य दर्शन हा त्याचा मूळ स्वभावधर्म आहे .आत्मनिष्ठ व तरल भावाविष्कार करणारा आकृतिबंध म्हणून याची प्रारंभिक ओळख आहे. मराठीत इरावती कर्वे, दुर्गा भागवत, गो. वि. करंदीकर, माधव आचवल, मधुकर केचे, श्रीनिवास विनायक कुलकर्णी यांनी या वाङ्मयप्रकाराला प्रतिष्ठा मिळवून देत रूपदृष्ट्या आकार दिला. त्याचा समाजसंवादी रूपविस्तार नव्वदनंतरच्या कालखंडात अधिक सामर्थ्यशीलपणे झाला. काही अपवाद वगळता ऐंशीच्या दशकापर्यंत या वाङ्मयप्रकाराला साचलेपण आलेले होते. गतकाळातील आठवरूपाची स्मरणरंजनप्रधान स्मरणचित्र रंगवणे आणि मध्यमवर्गीय नागर अनुभवाचे 'स्व'चे काल्पनिक खुरटे रचित रचणे असेच त्याचे स्वरूप होते.

जीवनशैली, देश-विदेशातील देशाटनानुभूती, वर्तमानातील सर्वस्पर्शी प्रश्न आदींना आशयसामग्री बनवत हे लेखन विस्तारले. समाजकारण, राजकारण, अर्थकारण, संस्कृती, धर्म, इतिहास, भूगोल, पर्यावरण, निसर्ग, कला, साहित्य, भाषा, शिक्षण, ज्ञान-विज्ञान, तंत्रज्ञान, आरोग्य-आहार, प्रसारमाध्यमे, प्रशासन, उद्योगजगत अशा अनेकविध अनुभवक्षेत्रांना सामावून घेत जीवनसंवादी झालेले हे लेखन या काळाला भिडल्याने वैशिष्ट्यपूर्ण ठरले आहे. त्याचा महत्त्वाचा विशेष म्हणजे यातील रोमँटिकता जाऊन ते अधिक वास्तवाभिमुख झालेले आहे. आत्मनिष्ठ 'मी'चा समाजनिष्ठ आविष्कार हा त्याचा गुणधर्म आहे. याची सुरुवात साठोत्तरी काळापासूनच झालेली होती. पण त्याला आकाररूप नव्वदनंतरच आले. या वाङ्मयप्रकाराच्या आविष्कारक्षमता लक्षात घेऊन रूपविस्तार करणाऱ्या या काळातील काही ठळक लेखकांचा निर्देश करता येईल. अनिल अवचट (छंदाविषयी), महेश एलकुंचवार (मौनराग), ग्रेस (वाऱ्याने हलते रान), वसंत आबाजी डहाके (मालटेकडीवरून), मारुती चितमपल्ली (निसर्गवाचन), अरुण टिकेकर (कालमीमांसा), अरुण खोपकर, (चलत्-चित्रव्यूह), सतीश काळसेकर (वाचणाऱ्याची रोजनिशी), भानू काळे (बदलता भारत), नागनाथ कोत्तापल्ले (उद्याच्या सुंदर दिवसासाठी), राजन गवस (कैफियत), प्रज्ञा दया पवार (टेहलटिकोरी), अमृता सुभाष (एक उलट एक सुलट) आणि आता या यादीत दासू वैद्य (मेळा) यांचाही समावेश करणे आवश्यक ठरेल.

'मेळा' पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, २०१९, लेखक- दासू वैद्य, पहिली आवृती , पृष्ठे- १४९, मूल्य- ३५०/- रु.

❖❖❖



Scanned with OKEN Scanner

# कादंबरी

## आकलन आणि आस्वाद





**संपादक**

प्रा. डॉ. राजकुमार किशनराव यल्लावाड

प्रा. डॉ. भारत सोपानराव हडीबाग



प्रा. डॉ. राजकुमार किशनराव यल्लावाड



प्रा. डॉ. भारत सोपानराव हंडीबाग



प्रा. डॉ. तुळशीराम चंद्रसेन ढकिरडे

'कादंबरी : आकलन आणि आस्वाद' या संपादित ग्रंथातील परीक्षणे वैविध्यपूर्ण व पृथगात्मक आहेत. मूळ कलाकृतीतील बलस्थाने व उणिवा यांचा शोध घेतांना तटस्थपणे केलेले मूल्यमापन त्या त्या परीक्षणाला एक मोल प्राप्त करुन देते. यातील परीक्षणे ही मूलग्राही व मर्मग्राही अशा स्वरुपाची असल्याची प्रचिती येथे यते. आशय व अभिव्यक्ती यांचे नेमकेपणाने पदर उलगडून दाखवतानाच काही लेखकांनी कलाकृतीच्या अनुषंगाने आकृतीबंधाचा केलेला विचार हा भाग महत्वपूर्ण ठरतो. विशेषत: अभिव्यक्ती अर्थातच भाषिक रुप लक्षात घेतांना अधोरेखित होणारे प्रादेशिकत्व भाषा अभ्यासकासाठी उपयुक्त ठरणारे आहे.

सृजकांचे सृजन वाचक रसिकांना आनंद देते; पण त्या आनंदाचा पुनर्पत्यय देण्याचे सामर्थ्य आस्वादात, समीक्षेत व परीक्षणात असते. प्रस्तुत संपादित ग्रंथातील लेखात पुनर्पत्याचा आनंद मिळतो. म्हणून हे लेख व हा ग्रंथ दखलपात्र ठरावा असा आहे.

**प्रा.डॉ. भारत सोपनराव हंडीबाग**

**एज्युकेशनल पब्लिशर्स ॲण्ड डिस्ट्रिब्युटर्स**
पोस्ट बॉक्स नं. १३१, गोकुळवाडी, औरंगपुरा,
औरंगाबाद-४३१००१. फोनः ०२४०-२३२९२०४
मो. ९४२१३०००३६, ९९७००६७९७१
Web- www.educationaldp.com

ISBN 978-81-941970-8-9
9 788194 197089

- ISBN- 978-81-941970-8-9

- कादंबरी आकलन आणि आस्वाद

- संपादक :

डॉ. राजकुमार यल्लावाड

डॉ. भारत हंडीबाग

डॉ. तुळशीराम उकिरडे

- सर्व हक्क संपादकाच्या स्वाधीन

- मुद्रक :

- अक्षर जुळवणी : श्री गणेश सातपुते

श्री स्वामी समर्थ एन्टरप्रायझेस, कळंब मो. ९७६६८५३२३७

- प्रकाशक : एज्युकेशनल प्रकाशन औरंगाबाद

- प्रथमावृत्ती : १ जानेवारी २०२०

- पृष्ठ संख्या : १८६

- मुल्य : १७० रूपये

प्रस्तुत पुस्तकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

Scanned with OKEN Scanner

दिसून येते. मराठी भाषेतील भाषाबद्दल आणि भाषामिश्रण या अनुषंगाने हा विचार अत्यंत सयुक्तिक वाटतो.

शेवटी सारांशरूपाने सांगत असताना असे म्हणावेसे वाटते की, शोभणे यांनी आपल्या समकालीन जीवन वास्तवाशी आपली नाळ घट्टपणे सांभाळून ठेवली. आपल्या गावची आणि माणसांची होत जाणारी शोकांतिका अत्यंत संवेदनशीलतेतून साकार केली आहे. म्हणूनच २००० नंतर मराठी कादंबरी का बदलत गेली या प्रश्नाचे उत्तर आपल्याला शोभणे यांच्या या कादंबरीतून पहावयास मिळते. जागतिकिकरणाने मानवी समाजावरती केलेले आक्रमण आणि त्यातून विशेषतः ग्रामीण समाजजीवनाची होत चाललेली स्थित्यंतरे अत्यंत विषण्ण करणारी अशीच आहेत. कारण पाऊस पडत नाही किंवा पडला तर तो अवकाळी पडतो आणि येणा-या पिकांपासून मिळणारे उत्पन्न आणि शेतक-यांच्या गरजा विचारात घेतल्या तर तो दिवसेंदिवस या बदलत्या जीवनशैलीच्या रेट्याखाली दबला आणि पिचला जात आहे. म्हणून खेडी ओस पडत आहेत तर शहरे फुगत चालली आहेत. हे थांबवायचे असेल तर ग्रामीण समाजाकडे आणि तिथल्या जीवन वास्तवाकडं अत्यंत सजगतेने आणि जागरूकतेने पाहणे गरजेचे आहे. हा आशावाद या कादंबरीतून प्रतिबिंबित होतो. शासकीय पातळीवरती केल्या जाणा-या घोषणा आणि त्याचे प्रत्यक्षात असणारे वास्तव हे जर विचारात घेतले तर ग्रामीण समाजाची होणारी शोकांतिका थांबू शकते असे वाटते. खरेतर पांढर या कादंबरीविषयी लिहीत असताना ग्रामीण समाज जीवन अनुभवलेल्या प्रत्येकाला हे जीवन चित्रण स्वतःचे वाटल्याशिवाय राहत नाही. इथेच शोभणे यांच्या लेखनाची समाजाभिमुखता प्रतिबिंबित होते.





# चिखलवाटा : एक आकलन

- डॉ. दीपक सूर्यवंशी
मराठी विभाग,
शि. म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय कळंब
मो. ९४२०९५८६९९

मानवी समाज जीवनात अनेक परिवर्तने होताना दिसतात. प्रत्येक काळातील होणारे हे स्थित्यंतरे आपणास त्या-त्या प्रसंगातून निर्माण झालेल्या साहित्यातून पहावयास मिळतात. साहित्य समाज यांचा एका अर्थाने सहसंबंध असलेला प्रवास यातून अधोरेखित झालेला असतो. माणूस-समाज व साहित्य असा व्यापक अनुबंध यातून निर्माण झाला आहे. थोडक्यात साहित्यनिर्मिती ही त्या-त्या काळातील अपत्य मानले जाते. ती सामाजिक गरजेतून समस्यांची उकल करण्यासाठी झालेली आपणास दिसते. साहित्यातून समाजाला आवश्यक असलेली जीवनमूल्य त्यातून समाजाची उन्नती अवलंबून असते. साहित्यकृती समाजाचा आरसा मानली जाते. कारण समाजातील वास्तव अधोरेखीत करण्याचे ते ख-या अर्थाने व्यासपीठ ठरते. तसेच या वास्तवाबरोबर कालानुरुप असणा-या बाबींची मांडणी साहित्य करते. जसे मनोरंजनात्मक, धार्मिक, चालीरीती, रूढीपरंपरा, राजकीय, घडामोडी, सांस्कृतिक व वर्ण व्यवस्थेविषयीची विस्तृत मांडणी त्यातून साकरली जाते. सारांशरूपाने सांगावयाचे जर भूतकाळातील अनुभव, वर्तमानाचे वास्तव व भविष्यकाळातील समाजाला दिशा देण्याचे सामर्थ्य साहित्यात असते.

साहित्यविश्वाचा प्रवास हा आदिम काळापासून ते वर्तमान काळाशी सुसंगत असा आहे. त्या त्या काळातील सामाजिक गरजा, जाणिवा व आव्हाने साहित्यातून रेखाटली गेलेली आहेत. असे सांगता येते की साहित्याचे दालन निश्चितपणे समृद्ध आणि समाजासाठी चिरंतन मार्गदर्शन करणारे आहे. साहित्यिक हा काळाची पाऊले ओळखून कलाकृतीला साकार करतो. कविता, कथा, कादंबरी, चरित्र, आत्मचरित्र अशा विविध साहित्य प्रकारापैकी ख-या अर्थाने जीवनाशी समरुप असलेला व्यापक साहित्यप्रकार म्हणजे कादंबरी. मराठी ग्रामीण कादंबरीमध्ये



Scanned with OKEN Scanner

भारतीय ग्रामव्यवस्था, ग्रामजीवन, ग्रामीण मातीशी असलेले सामान्य शेतक-यांचे विश्व अधोरेखित केलेले आहे. बदलत्या परिवर्तनीय व्यवस्थेचा आलेख कादंबरी वाङ्मयातून सशक्तपणे मांडला गेला आहे. समाजव्यवस्थेतील पारंपरिक लोकजीवन ते यांत्रिकीकरण, आधुनिकीकरण, उदारीकरण, सहकार, दुष्काळ, सावकार, व्यापार, दलाल, आडते, बाजारपेठ ते भरकटत चाललेले परिवर्तनीय जीवनाचा वेध यात समर्थपणे आला आहे. १९९० नंतरचे लोकजीवन विशेषतः शेतक-यांचे जीवन समग्रपणे यात बदलती यांत्रिकीकरणावर आधारित शेती, उत्पन्नाची नसलेली हमी, निसर्गाची लहरी व्यवस्था यामुळे त्यातील असलेल्या जीवन जाणिवा व परिणामी उद्‌ध्वस्त होणारे ग्रामजीवन असा एकूणच प्रवास यात आला आहे. भाषा, संस्कृती, सामाजिक व राजकीय घडामोडी, कृषी व्यवस्थेतील बदल, स्त्रियांच्या समस्या, बेरोजगारी, इंग्रजीला आलेले अवास्तव महत्त्व, सावकाराच्या विळख्यात अडकलेला एकेकाळचा प्रतिष्ठित शेतकरी, शेतमजूरांचे प्रश्न, भूमीहिनांचे गंभीर प्रश्न एकूणच ग्रामसंस्कृतीची होणारी पडझड या साहित्यातून वास्तवपणे रेखाटले जात आहे. परिणामी मनातील असणारी दुःखाची वेदना कमी होताना दिसत आहे. मानवी-नातेसंबंध आज अस्थिर बनत आहेत. छोटे उद्योजक, बलुतेदारी पद्धती, अल्पभूधारक यांची गळचेपी होताना दिसत आहे. शासनदरबारी घोषित केलेल्या दहा पेक्षा अधिक पंचवार्षिक योजनांचा झालेला प्रत्यक्ष फायदा किती? या अशा प्रश्नांची तीव्रता अधिकच जाणवायला लागते. विज्ञान-तंत्रज्ञान, मनोरंजन, रोजगाराच्या बदलेल्या नवीन संधी यामुळे तसेच दळणवळणाच्या आधुनिक सोईसुविधा व शेवटी-प्रसारमाध्यमांतून झालेली मोठी क्रांती अशा अनेक बाबींचा दूरगामी परिणाम शेती व्यवस्थेवर झाला तो ही नकारात्मक दृष्ट्या अधिक असाच मानण्याचा एक सूर दिसतो. आजची भारतीय शेतीव्यवस्था ही निसर्गावर अधिक अवलंबून आहे. दुष्काळ, गारपीठ, वादळ अशा समस्यांमुळे अखंड कष्ट करूनही हवे तेवढे उत्पन्न निघत नाही. सालगड्याचा प्रश्न, मजुरांचा प्रश्न, कमी क्षेत्र असल्याने यांत्रिकीकरण परवडत नाही. रासायनिक खतांचा भडीमार, बी-बियाणे, औषध-फवारणी तसेच साधनसामुग्री आणि शेवटी शेतमालाला बाजारात मिळणारा अत्यल्प भाव, परिणामी आजच्या भारतीय ग्रामीण व्यवस्थेचा कणा असलेली शेती ख-या अर्थाने एक जुगार ठरत आहे. अशा परिस्थितीत या धंद्यात कोणीही गुंतायला तयार नाही. शेतकरी त्यातील व्यापारी यंत्रणा, मिळालेले वर्षाकाठी उत्पन्न याबाबतीत व्यापक दृष्टिकोनातून



विचार व्यवस्थेने केलेला नाही. परिणामी शेतीशी संबंधीत असलेला वर्ग आज प्रगतीकडे न जाता अधोगतीकडे मार्गस्थ होताना दिसत आहे. वर्षभर काबाडकष्ट करुन माल काढायचा आणि या व्यवस्थेने तो संगनमत करुन लुबाडायचा अशीच परिस्थिती दिसते. भारतीय शेती व शेतकरी ख-या अर्थाने देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. मात्र त्याच घटकावर अन्याय होताना सर्वत्र दिसत आहे. शेतक-यांचे प्रश्न विचारात घेऊन, त्यांना वाचा फोडणसाठी, त्यांच्या पदरात न्याय पडावा यासाठी १९८० दशकात कॉम्रेड शरद जोशींनी शेतकरी संघटना स्थापन केली. आम्हाला भीक नको, हवे घामाचे दाम असा नारा देऊन शेतीमालाला-उत्पादन खर्चावर आधारित शेतमालाला हमीभाव मिळावा अशी शासनाकडे मागणी केली. या शेतक-यांच्या न्याय हक्कासाठी सर्वच स्तरातून शेतक-यांनी आपले समर्थन देऊन शरद जोशींच्या बरोबरीने हातात रूमणे घेऊन व्यापक आंदोलने केली. काही काळापर्यंत उभारलेले शेतकरी आंदोलन यशस्वी झाले. मात्र अल्पावधीतच आंदोलनाची असलेली दाहकता कमी होत गेली काही काळानंतर शरद जोशी हे एका विशिष्ट पक्षाचे म्हणून गेल्यानंतर सामान्य वर्गातील शेतकरी कुटुंबातील कार्यकर्ते हतबल झाले आणि ही संघटना दिशाहीन ठरली. मात्र एका ठराविक भूमिकेने वाटचाल केलेल्या या शेतकरी चळवळीच्या कार्यकर्त्यांना आपण यशस्वी, लढाऊ कसे राहिलो याचे समाधान वाटू लागले. अशाच शेतकरी व त्यांच्या चळवळीचे त्यांच्या आंदोलनाचे समग्र-समर्थ पैलू व वास्तव आलेख मांडणारी 'चिखलवाटा' ही सुरेंद्र पाटील यांची ग्रामीण कादंबरी आहे.

अर्जुन हा शेतीनिष्ठ शेतकरी, सच्चा लढाऊ कार्यकर्ता असून तोच यातील नायक मुख्य पात्र आहे. संघटनेची भूमिका विचारात घेऊन शेतकरी, सरकार, भांडवलदार यांच्यातील असलेल्या समस्यांसंदर्भात न्याय बाजू मांडण्याचा प्रयत्न करत आहे. शेतक-यांना न्याय देण्यासाठ तो सातत्याने लढत आहे. अर्जुन आपल्या आंदोलनाची, सुरूवात करताना गावातील, मटक दारु बंद करुन शोषणमुक्त व व्यसनमुक्त समाज निर्मितीचे कार्य हाती घेतो. तो पिढ्यानपिढ होणा-या अन्यायापासून ग्रामस्थांना न्याय देण्यासाठी धडपडतो, आंदोलनाला साथ द्यावी, अ आवाहन करतो, परिणामी लोकही साथ देतात. शेतक-यांच्या मुक्तीची पहाट लवकरच उगव असा विश्वास त्याला वाटू लागतो. प्रस्तुत कादंबरीतून शरद जोशींच्या मूलगामी शेत संघटनेच्या धोरणाविषयीची माहिती सुरेंद्र पाटील यांनी दिलेली आहे. शेतक-यांच्या उत्पाद



Scanned with OKEN Scanner

मिळणारा भाव हा खर्चावर आधारित दिला गेला नाही. परिणामी शेती व शेतकरी आर्थिक अडचणी व दारिद्र्यात अडकलेला आहे. शेतमाल वर्षभर कष्ट करुन पिकवल्यानंतर त्याचा जाहीर लिलाव करतात. मात्र कारखान्यातून निघालेल्या साध्या टाचणीची सुद्धा किंमत त्यात ग्रहीत धरली जाते. प्रचलित असलेल्या समाज व्यवस्थेत असामान्य न्यायविषयीची माहिती कादंबरीतून वास्तवपणे दिलेली आहे.

शेतकरी व त्यांच्या प्रश्नांवर सातत्याने विचार प्रवृत्त करणारी कादंबरी आहे. शेतकरी संघटनेचे तत्वज्ञान अत्यंत महत्त्वाचे असे अर्जुन मानतो. त्यातून त्याला असे वाटते, एक न एक दिवस शेतक-यावरील अन्याय-अत्याचार थांबेल. न्याय मिळेल असा आशावाद त्याला वाटत राहतो. शेती-शेतीच्या पसा-यात वर्षानुवर्ष राबराब राबून शेवटी चार आणे उरत नाहीत अशी पिढ्यानपिढ्या भारतीय शेतक-यांची अवस्था, यावर अर्जुन खिन्न होतो. त्यावर तो प्रचलित व्यवस्थेला प्रश्न विचारतो, "तुमचे सरकार कारकून एक होतात, हमाल बंड करतात मग शेतकरी ऐक हुईना का? समदे एक व्हयला जरा वेळ लागल पर अर्धे अधिक शेतकरी हैत जोशी साहेबांच्या मागं आता तुम्ही बघाच मजा बेटे हो, आरे चारं-कागदं काळ करुन म्हैन्याला पाच-पाच, धा-धा हजार पगार मोजताव तुम्ही नोकरदार, आनं तिच्या मायला रात्र दिवस कष्ट करुन माल पिकवून तुमच्या समध्यांच पोट भरावं शेतक-यानं, आन् उपाशी बी मरावं त्यानेचं हा कोंचा न्याय मंतो मी? रूमणं घेऊन उतरलाव हामी आता शेतक-यांनी एक व्हावं आणि आपल्यावरील अन्यायाविरुद्ध लढा द्यावा, तसेच जगाचा पोशिंदा उपाशी राहतो. ही खरीच शोकांतिका यातून मांडली. शेतकरी राबतो, समाजाला जगवतो, कारखानदारी चालते, उद्योगनिर्मिती होते, समाजाची पर्यायाने देशाची उन्नती होते. आर्थिक व सामाजिक स्तर उंचावतो, पण काही केल्या शेतक-यांना न्याय मिळत नाही. शेतकरी शेतमजुराची मुले शासन, प्रशासन, राजकारणात आहेत, परंतु शेतकरी वर्गाचे शोषण थांबले नाही. अशा निगरगट्ट असलेल्या परिस्थितीला लढा देण्यासाठी अर्जुन आपली आंदोलनाची भाषा उद्गारतो. आता गाईवानी गप हायच सोडलय हामी. या सरकारला शिंग दाखवायचे वेळ आल्यास शेतक-यांच्या जीवावर उड्या मारुन समदे त्यालाच तुडवाया बसलेत. म्हणून तर शेतकरी रस्त्यावर उतरल्यात. आता सरकारला हामचं आयकावंच लागल. हामच्या मालाला योग्य भाव द्यावाच लागेल." दरम्यान रामू घोरपडेच्या



घरावर आलेली बँकेची वसुली शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते श्रावण पवार, विश्वनाथ सावकार, सत्तारभाई, ढंगाळू भीमा हे अर्जुनच्या मार्गदर्शनाखाली त्यांना विरोध करुन पिटाळून लावतात. येथे आजच्या परिस्थितीची जाणीव होते. मोठ मोठे पुढारी उद्योगपती-कारखानदार बँकेचे लाखोच्या लाखो कर्ज अगदी आरामात बुडवतात, दिवाळं काढून राजरोस फसवतात, परदेशी जाऊन स्थायिक होतात, अशा लोकांवर मात्र धडक कारवाई कोणतीच व्यवस्था करताना दिसत नाही.

'चिखलवाटा' ही ग्रामीण मातीशी नाळ जोडलेली दर्जेदार कादंबरी ग्रामीण जीवनाच्या समस्यांचा वेध अचूकपणे घेतला आहे. राजकारण, समाजकारण व प्रशासनाकडून शेतक-यांना कधीच न्याय मिळाला नाही. प्रत्येक वेळेला नवीन आश्वासनांची खैरात केली जाते. त्यामुळे गावातील नागरिक शेतकरी एक होतात, अर्जुनच्या सांगण्यावरुन कार्यकर्ते (शेतकरी संघटना) आमदार जाधवांना गावबंदा करुन घेराव घालतात. याच अनुषंगाने सरकारच्या शेतकरी धोरणाबाबत श्रावण पवार म्हणतो, "सरकारची सारी धोरणंच शेतकरी भूकेकंगाल व्हावीत अशी आहेत. आपल्या शेतक-यांनी कधी सुखाचा घासं खावा असं वाटत नाही सरकारला! आपणच निवडून दिलेले हे नेते शेतक-यांचीच मुलं, पण काय कराव? पण त्यांची मेहरबानी नको शेतक-याला... आपल्याला हवायं आमचा हक्क, आमच्या श्रमाचा मोबदला आम्ही सर्वांनी रक्त ओकून पिकवलेल्या पिकांला हमी भाव." शेतक-यांच्याविषयीची आत्मियता तळमळ यातून विशद केली आहे. ग्रामस्थ एक होतात, बँकेचे अधिकारी, पुढारी, लाईनमन, नोकरदार यांना गावबंदी करुन प्रचलित समाजव्यवस्था व सरकारचा निषेध करतो. समाज बांधवांना एकत्रित करुन संघटना बळकट करण्याचे काम अहोरात्र अर्जून करतो. परंतु त्याला घरातूनही म्हणाल तेवढी साथ मिळत नाही. त्यांच्या वडीलांना (आबा) संघटनेचे काम म्हणजे फुकटच्या, पुढारक्या वेळ घालणे असे वाटते, परिणामी दैनंदिन शेतीतील कामे वेळेवर होत नाहीत. मुलगा विकासकडे दुर्लक्ष होते. मुलगी धोंडूबाईचे लग्न लांबणीवर पडते. लोकांकडून घेतलेले प्रपंचासाठीचे उसने पैसे वेळेवर परतफेड करता येत नाहीत. एकूणच कुटुंबाकडे दुर्लक्ष होते. अशा अनेक समस्या निर्माण होतात. आबांना वाटते अर्जुन त्याची संघटना व शरद जोशी हे आमच्या मुळावर आहेत. अशी ही ग्रामीण कादंबरी कुटुंबातील नातेसंबंधही व त्यांच्यातील भावनिक मनाच्या अवस्था रेखाटते. सुरेंद्र पाटील यांनी आपल्या अवती भोवती असणा-या शेतक-यांच्या जीवनाविषयी



Scanned with OKEN Scanner

प्रस्तुत कादंबरीत बाप-लेक, बहीण-भाऊ व पती-पत्नीच्या नातेसंबंधातील घालमेल रेखाटली आहे. एकीकडे कौटुंबिक जबाबदा-या व प्रसंगी संघटनेच्या कामामुळे होणारी अडचण यात मांडली. दहा वर्षाच्या प्रदीर्घ कालावधीत फक्त दहा हजार कर्ज माफ होते. परंतु लढा देऊनही शेतीमालाला हमीभाव मिळवता आला नाही. शेतकरी कर्ज मुक्त झाला नाही. संघटना अस्तित्वहीन होऊ लागली. सांसारिक प्रश्न वाढत राहिले. परिणामी अर्जुन हा एका अपयशी लढ्याचा शिलेदार म्हणून शिक्का त्याच्यावर बसला. शेतकरी कुटुंबातील जीवनाच्या व्यथा यात परिणामकारकरित्या आलेल्या आहेत. शेतीनिष्ठ संस्कृती, श्रममूल्यांना आलेले दुय्यम स्थान कादंबरीतील अर्जुनचे वडील आबा वयोमानानुसार व असीम केलेल्या कामामुळे थकलेले आहेत. कुटुंबात वारकरी संस्कार आहेत, परंतु कोणापुढेही कुणब्याला वाकावेच लागते अशी मानसिकता परिस्थितीमुळे झालेली आहे. कादंबरीतील आबा हे पात्र ग्रामजीवनातील शेती-व्यवस्थेशी समरुप झालेले आहे. वर्षानुवर्षे शेतीत राबता राबता प्रसंगी निराशा आली तरी पुन्हा नव्याने नवनिर्मिती करतात. दुःखाला आनंदाने सामोरे जाताना दिसतात. आपल्या शेतात पाण्याची सोय करावी यासाठी ते बोर घेण्याचा विचार करतात. त्यासाठी मशीन लवकर यावी याकरिता वांरकरी असूनही ते बक-याच्या जेवणाची सोय करतात. शेतीवर त्यांची असीम निष्ठा आहे. ते स्वतःला अगोदर कुणबी (शेतकरी) नंतर वारकरी समजतात. आपल्या कुटुंबाला पंढरपूरला विठ्ठलाच्या दर्शनाला घेऊन जाण्याची इच्छा त्यासाठी ते पैसे जमा करतात. परंतु तेच पैसे बोरची मशीन लवकर यावी याकरिता कोंबड्या-बक-याच्या जेवणाचा खर्च करण्यासाठी घालतात. यावरून त्यांची शेतीनिष्ठा किती प्रबळ आहे, हे यात दर्शविले आहे. पाणी लागेल, ऊस करता येईल, लोकांना बघण्यासारखी शेती करू. शिवाय अर्जुनचे मन रमेल. त्याचे कुटुंब सावरेल असा आशावादही वाटतो परंतु नियतीच्या खेळात वेगळेच होते पाणी लागत नाही. तेव्हा त्यांना प्रचंड दुःख होतं, आपण वारकरी असूनही पाणी लागत नाही हे वास्तव ते स्वीकारतात आणि पुन्हा आपल्या नशिबालाच दोष देतात.

आबा हे प्रतिनिधिक पात्र एका शेतक-याच्या जीवनाची व्यथा सांगून जातात. शेतीशी जोडलेले जीवन, शेती ही आत-बट्ट्याचा व्यवसाय असा जरी असला तर पुन्हा एकदा नव्याने तो सुरू करावा लागतो. पाऊस वेळेवर पडत नाही. पेरणी व्यवस्थित होत नाही. पंचांग खोटे



ठरू लागते, हवामान खात्याचे अंदाज चुकू लागतात. अशा परिस्थितीत शेतकरी अस्वस्थ होतो. सांसारिक गरजापुढे तो नडला जातो, असे असले तरीही शेती विकण्याचा विचार आबा कधीही करीत नाहीत. अशावेळी निवृत्ती साळुंक्याला म्हणतात, "पुन्हा हामच्या जमीनीचं नाव काढल तर चिकुलवाटांत गळ्यापस्तोर पुरीन मनाव त्याला." शेती आज ना उद्या पिकेल पण प्रत्येक अडी-अडचणीला विकत बसलो तर मुला बाळाला दिवस येतील. याच जाणिवेने आबा शेती विकत नाही. शेती-मातीवर निष्ठा करणारे आबा विकासाच्या बाबतीत शिक्षणाला महत्त्व देतात. धोंडूबाईच्या लग्नासाठी, शिकलेला आणि नोकरदार मुलाचा शोध घेतात. परिणामी बदलत्या जीवनाच्या प्रवाहात शहरे आणि गाव यातील अंतर कमी होताना दाखवले आहे. व्यंकट-साधना या नवतरुणावर बदलत्या शहरी, संस्कृतीचा प्रभाव दाखविला आहे. आज ग्रामीण भागाचे चित्र बदलले असून शहरी कळा त्यात जाणवतात. क्रिकेटचे खेळ, मोबाईलचे तरुणांना असलेले वेड, व्यसनाधीनता, टीव्ही, संगणकाचे आकर्षण त्यांच्यावर मोठ्याप्रमाणात दिसते. व्यंकट-साधना ही नोकरदार पती-पत्नी मात्र नोकरी व गावाकडील घर यांच्याकडे होणारे दुर्लक्ष, भाऊ -भावातील , पती-पत्नीमधील, मुलगा-वडील यांच्यातील संवाद-विसंवादाचे अचूक वर्णन कादंबरीत आलेले आहे. शेतीमध्ये राबणारी जुनी पिढी तर तितकेच शेतीशी दुरावली गेलेली नवी पिढी, एकमेकांवर असलेली ग्रामव्यवस्थेतील भाऊबंदकी, नैतिक व सामाजिकतेचे असणरे भान, संयुक्त कुटुंब पद्धती, भावभावना, नातेसंबंधाना दिले जाणारे महत्त्व अशा अनेक वैशिष्ट्यांनी ओतप्रोत असलेली एक ग्रामीण कादंबरी सुरेंद्र पाटील यांनी 'चिखलवाटा' २००७ साली साकारली असून त्यात ग्रामीण साहित्याचा प्रवाह प्रवाहित केला आहे.



Scanned with OKEN Scanner

(2)

2019-20

# ललितगंध

संपादक

माधव गरड

डी. के. शेख

प्रा. डॉ. दीपक सूर्यवंशी



anilnirmiti@gmail.com



Scanned with OKEN Scanner



माधव गरड



डी. के. शेख



प्रा. डॉ. दीपक सूर्यवंशी

ललितगद्याची निर्मितिप्रक्रिया म्हणजे लेखकाने व्यक्तिमत्व संपन्नतेने निर्मिलेली, प्रतिभासामर्थ्याची मुद्रा धारण केलेली खूणच असते. प्रतिभावंताच्या मनामध्ये भाव-भावनेची आंदोलनं घुसळण करतात तेव्हा विचार महत्वाचा असला तरी अनुभवाला विचारस्पर्श न होता भावनांच्या लाटांवर आरूढ होऊन त्या लाटा तळहाती पकडण्याचा समर्थ प्रयत्न म्हणजे ललितगद्य.

मला आलेला अनुभव माझ्या व्यक्तिमत्वात विरघळून जातो आणि त्याला मनातच कल्पनेची झूल चढवली जाते.हेच प्रत्यक्षात अवतरतं तेव्हा त्याच्या मी सह नवी संवेदनपातळी घेऊन, नवी कळा, नवं रूप धारण करते तेव्हा ते विलोभनीय होतं. ते विलोभन ज्याच्या त्याच्या स्वत्वाचं असतं.

ललितगंध मधील तीस लेखक लेखिकांच्या समर्थ लेखणीतून उतरलेलं अनुभवविश्व त्यांच्या त्यांच्या बाजासह आपल्या पुढ्यात आहे.

मराठवाडी भाषेची गाज, मराठवाडी मनाचं स्पंदन आणि मराठवाडी मातीची देण असलेलं हे संपादन एक महत्वाचा संदर्भग्रंथ ठरेल असा आहे. या लेखांना काही मर्यादा नाहीत असं नाही परंतु मर्यादांची कुंपणं तोडून अमर्याद पदरात देण्याचं सामर्थ्य या ललितगद्यात नक्कीच आहे.

माधव गरड

₹ 200/-

ISBN : 978-93-87322-28-8

संवाद प्रकाशन प्रा. लि.

८७३, क/२, सी वॉर्ड, सिध्दीश्री प्लाझा, राजाराम रोड, कोल्हापूर-४१६००२

संवाद प्रकाशन प्रा. लि.
anilnirmiti@gmail.com

Scanned with OKEN Scanner

ललितगंध
संपादक
माधव गरड, डी. के. शेख, प्रा. डॉ. दीपक सूर्यवंशी
Lalitgandh (Marathi Essay)
Edited By
Madhav Garad, D. K. Shaikh &
Pra. Dr. Deepak Suryawanshi

© : सर्व लेखक
4214

प्रकाशक
अनिल म्हमाने/शोभा चाळके
संचालक
संवाद प्रकाशन प्रा. लि.
८७३, क/२, सी वॉर्ड, सिद्धीश्री प्लाझा,
राजाराम रोड, कोल्हापूर- ४१६००२
मो. ०९८२२४७२१०९, ०९८९०५५४३४०
Email-anilnirmiti@gmail.com

प्रथमावृत्ती : १० जानेवारी २०२०
मुखपृष्ठ : विष्णू थोरे
अक्षर जुळणी : नेताजी जावीर
मुद्रक : मिरर ऑफसेट, कोल्हापूर
प्रकाशन क्रमांक : १३२०

ISBN : 978-93-87322-28-8

स्वागतमूल्य : रु २००/-



481

## मनोगत

'ललितगंध' हे ललित लेखाचे संपादन रसिक वाचकांच्या हाती देताना आम्हाला जो आनंद होत आहे, तो शब्दातीत असा आहे. उस्मानाबाद जिल्ह्यातील लेखक - लेखिका किती वैविध्यपूर्ण आणि दर्जेदार ललित लेखन करतात, याचा पुरावा म्हणजे 'ललितगंध' हे संपादन होय. या पुस्तकातील लेखांचा गंध वाचकांच्या मनात कायमस्वरूपी दरवळत राहील, एवढे हे लेख अप्रतिम असे आहेत. पाच वर्षापूर्वी हाती घेतलेले काम आज पूर्ण होताना आम्हाला भरून पावल्यासारखे वाटत आहे.

उस्मानाबाद जिल्हा साहित्य संकलन,संपादन आणि प्रकाशन प्रकल्पाच्या वतीने यापूर्वी 'दिशा - उस्मानाबादच्या कविता १९२० ते २००३' व 'उस्मानाबादची कथा १९६० ते २०१४' ही दोन संपादने आम्ही प्रकाशित केली. त्या प्रकल्पातील 'ललितगंध' हे तिसरे संपादन आहे. पहिल्या दोन्ही संपादनाला रसिक वाचकांनी भरभरून प्रतिसाद दिला होता. 'ललितगंध' ला तर त्यापेक्षा कितीतरी पटीने अधिक प्रतिसाद देऊन रसिकांनी आम्हाला आश्चर्यचकित करून टाकले आहे. पुस्तके विकली जात नाहीत, अशी ओरड होत असणाऱ्या या काळात प्रकाशनपूर्व तीनशे पुस्तकं विकली जाणं ही बाब वाचनसंस्कृतीला निश्चितच बळ देणारी आणि साहित्यिकांचा उत्साह वाढवणारी आहे.

'ललितगंध' साठी लेख उपलब्ध करून दिलेल्या सर्व लेखक - लेखिकांचे मनःपूर्वक आभार.अक्षर जुळवणी केलेले सुमीत जावीर, अप्रतिम असे मुखपृष्ठ तयार करून दिलेले कवी आणि चित्रकार मित्र विष्णू थोरे आणि दर्जेदार असे पुस्तक प्रकाशित केलेले प्रकाशक अनिल म्हमाने सरांचे मनःपूर्वक आभार. हे महत्वपूर्ण संपादन रसिक अभ्यासकांच्या पसंतीस नक्कीच उतरेल, अशी आशा आहे.

डी.के.शेख
संयोजक व संपादक
उस्मानाबाद जिल्हा साहित्य संकलन,
संपादन आणि प्रकाशन प्रकल्प.


08

Under the patronage of the
Indian
National Commission
for Cooperation with UNESCO

UNESCO
United Nations
Educational, Scientific and
Cultural Organization

MCI MSD 2020

# MCIMSD 2020




Virendrasinh Khandare
Editor in chief

200

Scanned with OKEN Scanner

MCIMSD 2020 (Volume II) :
(A collection of articles, essays and research papers submitted to International conference on Intangible cultural Heritage, MCIMSD 2020 held at Pune on 21 to 24 February, 2020)

ISBN978-81-89730-35-2

Publisher:
Lokvidya Prakashan
Indian Institute of Social Sciences and Folklore Research,
Shivram Nagar, Parbhani 431 401

First edition:
21 February, 2020

All rights are reserved

Printer:
Pranav Printers
Sadashiv Peth, Pune

Price:
500 INR

No one should use any part of this book for any purpose without the prior permission of the editor.

The text contained in this book are articles, essays, research papers by various researchers, authors submitted to the International conference on Intangible cultural Heritage, MCIMSD 2020 held at Pune on 21 to 24 February, 2020. Editor does not necessarily agree with the thoughts and opinions of the authors involved in this book. The author will solely responsible for his / her writing.

Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| 123. | श्री. महादेव दिनकर इरकर | माणदेशातील मेंढपाळ धनगर समाजाचे लोकनृत्य–गजीढोल (कैफत) | 649 |
| 124. | डॉ. जयसिंग सिंगल | राजपुत भामटा जातीतील विवाह पध्दत | 654 |
| 125. | अजय शिनगारे | पेठशिवणी गावची थोडक्यात माहिती | 661 |
| 126. | आकाश भस्के | वीरशैव संप्रदाय | 666 |
| 127. | प्रा. अनंत मोगल | कीर्तन परंपरा व बदलते स्वरूप | 671 |
| 128. | प्रा. बदने अर्चना | लोकजीवनातील कृषिविधी - वेळ अमावस्या | 676 |
| 129. | डॉ. अरुण देवरे | आगरी समाजाच्या संस्कार पद्धती | 680 |
| 130. | प्रा. अरुण कुलकर्णी | कीर्तन : एक भक्तिप्रकार | 683 |
| 131. | डॉ. अविनाश पांचाळ | पांचाळ सुतार समाजाचे योगदान | 689 |
| 132. | डॉ. बाजीराव पाटील | गुरव समाजाचे सामाजिक योगदान | 692 |
| 133. | डॉ. बालाजी गव्हाळे | संत रोहिदासांचा मानवतावादी दृष्टिकोन | 696 |
| 134. | भागवत बामणे | कान्हेगावच्या भूत कथेचे वास्तव | 703 |
| 135. | सौ. भाग्यश्री कालगावकर | गुरव एक जमात | 707 |
| 136. | डॉ. चांदोजी गायकवाड | मादळ लोकाचाराचे विधिनाट्य | 712 |
| 137. | डॉ. चांगदेव मुंढे | 'पावरा' जमातीतील वैवाहिक संस्कृती | 723 |
| 138. | डॉ. व्यास सी. पी. | ऐतिहासिक नगरी लोणार येथे चक्रधर स्वामींचे वास्तव्य व कार्य | 728 |
| 139. | डॉ. व्यास सी. पी. | महाराष्ट्रातील गुरव समाजाची ऐतिहासिक वाटचाल | 733 |
| 140. | दत्ता चव्हाण | अक्षरवाङ्मय : लोकसाहित्य | 737 |
| 141. | डॉ. दत्ता कांबळे | संत जनाबाईंच्या अभंगातील विद्रोह जाणीव: एक आकलन | 740 |
| 142. | डॉ. दीपक सूर्यवंशी | मराठवाड्यातील लोकगीत स्त्रीवादी दृष्टिकोन: एक परामर्श | 745 |
| 143. | दिगंबर कोकाटे | पालम येथील आराध्य दैवत खंडोबा | 758 |
| 144. | गजानन शेटे | महात्मा बसवेश्वरांची शिकवण | 763 |
| 145. | गीतांजली शिंदे | लीळा चरित्रातील चक्रधर स्वामी | 767 |
| 146. | डॉ. घ. ना. पांचाळ | बलुतेदारांची हत्यारे आणि अवजारे | 771 |
| 147. | प्रा. इंदू साळुंके | कृषी संस्कृती आणि शाश्वत विकास | 775 |
| 148. | सौ. कल्याणी भगवान | श्री क्षेत्र कोंढणपूर | 779 |


Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| 123. | श्री. महादेव दिनकर इरकर | माणदेशातील मेंढपाळ धनगर समाजाचे लोकनृत्य–गजीढोल (कैफत) | 649 |
| 124. | डॉ. जयसिंग सिंगल | राजपुत भामटा जातीतील विवाह पध्दत | 654 |
| 125. | अजय शिनगारे | पेठशिवणी गावची थोडक्यात माहिती | 661 |
| 126. | आकाश भस्के | वीरशैव संप्रदाय | 666 |
| 127. | प्रा. अनंत मोगल | कीर्तन परंपरा व बदलते स्वरूप | 671 |
| 128. | प्रा. बदने अर्चना | लोकजीवनातील कृषिविधी - वेळ अमावस्या | 676 |
| 129. | डॉ. अरुण देवरे | आगरी समाजाच्या संस्कार पद्धती | 680 |
| 130. | प्रा. अरुण कुलकर्णी | कीर्तन : एक भक्तिप्रकार | 683 |
| 131. | डॉ. अविनाश पांचाळ | पांचाळ सुतार समाजाचे योगदान | 689 |
| 132. | डॉ. बाजीराव पाटील | गुरव समाजाचे सामाजिक योगदान | 692 |
| 133. | डॉ. बालाजी गव्हाळे | संत रोहिदासांचा मानवतावादी दृष्टिकोन | 696 |
| 134. | भागवत बामणे | कान्हेगावच्या भूत कथेचे वास्तव | 703 |
| 135. | सौ. भाग्यश्री कालगावकर | गुरव एक जमात | 707 |
| 136. | डॉ. चांदोजी गायकवाड | मादळ लोकाचाराचे विधिनाट्य | 712 |
| 137. | डॉ. चांगदेव मुंढे | 'पावरा' जमातीतील वैवाहिक संस्कृती | 723 |
| 138. | डॉ. व्यास सी. पी. | ऐतिहासिक नगरी लोणार येथे चक्रधर स्वामींचे वास्तव्य व कार्य | 728 |
| 139. | डॉ. व्यास सी. पी. | महाराष्ट्रातील गुरव समाजाची ऐतिहासिक वाटचाल | 733 |
| 140. | दत्ता चव्हाण | अक्षरवाङ्मय : लोकसाहित्य | 737 |
| 141. | डॉ. दत्ता कांबळे | संत जनाबाईंच्या अभंगातील विद्रोह जाणीव: एक आकलन | 740 |
| 142. | डॉ. दीपक सूर्यवंशी | मराठवाड्यातील लोकगीत स्त्रीवादी दृष्टिकोन: एक परामर्श | 745 |
| 143. | दिगंबर कोकाटे | पालम येथील आराध्य दैवत खंडोबा | 758 |
| 144. | गजानन शेटे | महात्मा बसवेश्वरांची शिकवण | 763 |
| 145. | गीतांजली शिंदे | लीळा चरित्रातील चक्रधर स्वामी | 767 |
| 146. | डॉ. घ. ना. पांचाळ | बलुतेदारांची हत्यारे आणि अवजारे | 771 |
| 147. | प्रा. इंदू साळुंके | कृषी संस्कृती आणि शाश्वत विकास | 775 |
| 148. | सौ. कल्याणी भगवान | श्री क्षेत्र कोंढणपूर | 779 |


Scanned with OKEN Scanner

# मराठवाड्यातील लोकगीत स्त्रीवादी दृष्टीकोन : एक परामर्श

डॉ.दीपक सुभाषराव सूर्यवंशी
मराठी विभाग
शि.म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय कळंब
ता. कळंब, जि. उस्मानाबाद – ४१३५०७
मो. ९४२०९५८६९९
deepaks2021@gmail.com

**प्रास्ताविक :**

लोकसाहित्य समूहाच्या मनाचे भावभावना प्रकट करणारे असते. परंपरा, रूढी, प्रथा यांच्या माध्यमातून लोकसाहित्याच्या ऋणानुबंध समाजात पहावयास मिळतात. ही लोकसाहित्याची बीजे अनादिकाळापासून प्रचलित असल्याचे स्पष्ट दिसते. ग्रामीण साहित्याशी त्याची कायम नाळ जोडलेली आपणास दिसून येते.

"लोकसाहित्य हे अनमोल रतन, सदियों से हम करते आए जतन,
इस रतन से सारा जग साझे"

प्राचीनकाळी ओवीगीते गाण्याची मौखिक परंपरा होती. आपले मन रिकामे करण्याची ती कला होती. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे ही सर्व मुक्तपणे संचारत असत. स्त्रियांचे भावविश्व, श्रद्धा, संतमहिमा, शेतातील पीक काढणी, दळण-कांडण, चाळण करताना, वेड, शेवया, कुरड्या करताना, दैनंदिन कामे करताना अनेक ओवी गीतांची निर्मिती झालेली आहे. स्त्रीची अगदी सकाळची सुरूवातच

"तुळशी-तुळशी पाणी घालते,
कळशी-कळशी घालशील केंव्हा बान तेंव्हा
माझा नमस्कार तेहतीस कोटी देवा"

**भारतीय संस्कृती व नातेसंबंध :**

भारतीय संस्कृतीत नातेसंबंधांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. समाजातील स्त्रिया म्हणजे अलोट श्रद्धा, अमर आशावाद, त्यागमूर्ती, तपस्या व मूकसेवा यांचे जणू प्रतीक आहेत. त्यांनी निर्मिलेले साहित्य हे अनुभवसिद्ध अक्षर वाङ्मय आहे. त्यामधील सर्वात व्यापक दालन म्हणजे लोकगीत, लोककथागीते, खेळगीते, पाळणे, डोहाळे,


MCIMSD 2020 ISBN: 978-81-89730-35-2

Scanned with OKEN Scanner

प्रसंगगीते, इ. निमित्ताने नवनिर्मिती केलेली आहे. लोकगीतात वाङ्मयीन कर्तृत्व दिसते. ग्रामीण भागातील स्त्री ही अशिक्षित समजली जाणारी आहे. त्यात मोठ्या प्रमाणात समूहभाव प्रकट होत असतो. लोकगीतांना लोकसाहित्यातील आत्मा असे म्हटले. अशा या अनुभवसंपन्न गीतांची निर्मिती कवी केशवसुतांनी म्हटल्याप्रमाणे, "गाण्याने श्रम होतात हलके, हे ही नसे थोडके" अशा लोकसाहित्यातील लोकगीतांमधून भारतीय 'स्त्रीयांचे मन' प्रकटते. म. मो. दत्तो वामन पोतदार यांनी लोकसाहित्यातील गीतांना वेद आहेत असे स्त्रियांनी मौखिक वाङ्मयाची परंपरा जतन केली आहे.

"पितृसत्ताक समाजव्यवस्थेने दडपून टाकलेल्या, कोंडमारा केलेल्या स्त्रीमनाचा, स्त्रीजीवनाचा, त्या समाजव्यवस्थेविरूद्ध दिलेल्या संघर्षाचा आविष्कार घडविणारे साहित्य म्हणजे स्त्रीवादी साहित्य."

ज्या परमेश्वराने ही आश्चर्यकारक सृष्टी निर्माण केली, त्यानेच स्त्रीपुरूष निर्माण केले, तरी सर्व प्रकारचे साहस, दुर्गुण स्त्रियांच्या अंगी वसतात किंवा जे अवगुण स्त्रियांचे अंगी आहेत, तेच पुरूषात आहेत किंवा नाहीत हे अगदी स्पष्ट करून दाखवावे याच हेतूने ताराबाई शिंदे यांनी स्त्री-पुरूष तुलना ग्रंथ लिहिला आहे.

फ्रेंच स्त्रीवादी लेखिका सीमॉन-दी-बोव्हा The Second Sex "A women is not born woman, she is made a woman" अशी विषयसूत्राची मांडणीच केली.

प्रसंगानुरूप स्त्रियांची लोकगीते पुरूषप्रधान संस्कृतीत स्त्रियांना दुय्यम स्थान देण्यात आले आहे. याचा परिणाम स्त्रियांनी लोकगीताच्या माध्यमातून मन मोकळे करण्यासाठी एक माध्यम समजले. मूळ रामायणातील रामकथा नायकप्रधान आहे, परंतू मौखिक अवस्थेत पारंपरिक स्त्रियांनी याच कथेला सीताप्रधान केले आहे. त्याबरोबरच रामाकडून सीतेवर अन्याय झाला याचा निषेध या गीतातून केला आहे.

"राम नाही राम, सीताबाईच्या तोलाचा
हिच्या मोठा सीताला, राम हलक्या दिलाचा"

प्रस्थापित विचारधारेतून पुरूषी वृत्तीला विरोध करून रामाचा निषेध करण्याचा मानस या लोकगीतातून आलेला आहे. रामाला श्रेष्ठ मानले गेले असले तरी स्त्री रामाच्या वर्तनाबद्दल असमाधान व्यक्त करतात. समताधिष्ठीत समाजरचना प्रस्थापित करण्यासाठी स्त्री लोकगीताचा आधार घेते. स्त्री तर मुळातच उपेक्षित पण



MCIMSD 2020 ISBN: 978-81-89730-35-2

Scanned with OKEN Scanner

त्यातही दलित स्त्री कितीतरी दुर्लक्षित. पण या बाबतीत पारंपरिकतेला स्पष्ट नकार देण्याचे धाडस अशी स्त्री करते ते पुढीलप्रमाणे

"रामनाम घेऊन, काही नाही गावलं,

भीमराया मव्हा देव, त्यानं आम्हाला तारलं"

महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारसरणीतून स्त्रियांनी आपल्या भावभावनांना बुद्धीवादी भूमिकेतून मांडल्या आहेत. स्त्रीगीतात एक प्रकारचा आत्मविश्वास दिसून येतो. परंपरा नाकारून आधुनिकतेवादाकडे वाटचाल करणारी स्त्री ही दिसते आहे.

**पती-पत्नीविषयी स्नेहभावना :**

स्त्री ही विवाह झाल्यानंतर आपले सर्वस्व त्याग करून परक्या घरी नांदायला जाते. ती सर्वांची मने जिंकते, वेळोवेळी सत्ता-संघर्ष अनुभव यांत तडजोड करावी लागते. आपल्या संस्कृती प्रमाणे या दोघांमध्ये अपार प्रेमभावना असल्याचे दिसते. व्यावहारिक संसारिक नात्यात हे अगदी वेगळे व विश्वासावर आधारलेले नातेसंबंध आहे. पती-पत्नीचे नाते हे अनोखे, मोहक स्वरूपाचे आहे. ते अशा शरीर स्वरूपावर आधारित आहे. जन्मोजन्मीचा संदर्भ ठिकठिकाणी लोकसाहित्यात आढळतो. पतीची सेवा ती सातत्याने करते.

"नारायण बाप्पा आयुष्य माझं कमी करा

कपाळीच्या कुंकाचा करंडा माझा मेनाचा दुसरा

हाय बुड्याला आसर

दुबळा भरतार आणि तो ताजा शेर

त्याला म्हण सावकार

गावाला बाई गेले वाटेवरी माझा डोळा

भर जातीचा केवडा

काकणाचा हात, कथांच्या उशाखाली

पिरतीचा झोपी गेली पाणसई

नारायणा बाप्पा तापू नको, तू इकला

 ISBN: 978-81-89730-35-2
Scanned with OKEN Scanner

माझ्या कुंकवाचा टिकला तुझ्या उन्हानं सुकला"

आयुष्यात पती-पत्नीचे सुख असल्याने सर्व कांही प्रपंचात मिळाले ही भावना स्वाभाविकपणे,

"हे ग भ्रताराच सुख तळ हाताची सावली

परदेशात मावली ऐसी आठवू नाही देली"

गावाला येले बाई माझ्या मनाचे मोहन, गोड लागेना जेवण

आपली बहुजनांची ग्रामीण संस्कृती ही खरोखरच महान आहे. आपल्या आईवडीलांविषयीची आस्था तिच्या ठिकाणी स्पष्ट गीतातून

माता काय जाती माती खाते मी गाळून

बापाच्या नावासाठी देह टाकिते आळून

**आईवडीलांविषयीची भावना :**

भारतीय संस्कृतीत सर्व नातेसंबंधाना अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. आपल्यावर कुटुंबातच अनेक संस्कार होतात. आई-वडील, भाऊ-बहिण, नणंद-भावजय, आत्या-मामा, मावशी-काका-काकू अशा प्रकारची नात्याची वीण गुंफलेली असते. एकमेकांचे नाते अतिशय प्रेमाचे जिव्हाळ्याचे असतात.

"माहेरच्या वाटे मऊगार हरिक दाटे

सासरच्या वाटे टोचती कुचकुच काटे

नवरीच्या बापा चिंता लागली लेकीची

कोण तिचा धनी होईल ती कुणाची

बहिणीला भाऊ, एकतरी असावा

चोळीचा एक खण एकरातीचा विसावा"

तसेच जेंव्हा मुलगी ही परक्या घरी नांदायला जाते, जेंव्हा तिची भावना आई-वडीलांविषयी लोकगीतातून अभिव्यक्त होताना.

सोन्याची अंगठी कशानं झिजली

पित्या ग दौलताने, रासा गव्हाची माजली



MCIMSD 2020 ISBN: 978-81-89730-35-2

Scanned with OKEN Scanner

आई-वडीलांविषयी स्त्रियांना नितांत आदर प्रेम व आत्मीयता असते. पूर्वी स्त्रियांना भल्या पहाटे उठून जात्यावर दळणाला बसावे लागत असे. जात्याला ती इश्वर मानून आपल्या मनातील भाव प्रकट करत असे.

जात्या तू इश्वरा जाऊ नको जड

किंवा – पयली माझी ओवी ग मायच्या मायला
लोढणं वढाळ्या गायीला

तसेच ती आपलं मन मोकळ करताना म्हणते,

जात्या तू इश्वरा, कोण्या डोंगरीचा ऋषी
भावा भैनीवानी, हुरदं उकलीलं तुझ्यापायी

याच उदात्त भावनेबरोबर ती आपल्या नातेसंबंधात भावाला खूप महत्व देते.

चंदनाचा टिळा, बंधू माझा कोठं गेला
लाडूचा पाहुणचार, बहिणीनं केला

**देवपूजा सांस्कृतिक ओळख :**

धार्मिक-सांस्कृतिक स्वरूपाची उपासना व्यक्त करणारी अनेक गीते आहेत. वर्षभर अनेक सण समारंभ-उत्सव येतात. यावर अनेक गीतांची रचना स्त्रियांनी केलेली दिसते. नागपंचमी, मंगळागौर, दसरा, दिवाळी, पाळणे, शिखरी पौर्णिमा, मकरसंक्रांत, वटपौर्णिमा अशा अनेक प्रसंगी हे लोकगीत गातात विशेषतः मराठवाड्यातील लोकगीताच दालन हे अतिशय समृद्ध स्वरूपाच आहे.

चल-ग सखे बारूळाला, वारूळाला
नागोबाला पूजायला, पूजायला

दिवाळी सण मोठ्या आनंदाचा, कृषीपरंपरेत सतत व्यस्त असणाऱ्या महिलांना या सणाचा वेध नागपंचमी, दसऱ्यापासूनच लागतो, ती आतुरतेने वाट पाहते,

दसऱ्यापासून दिवाळी वीस रोज
वाट पाहते नित रोज



Scanned with OKEN Scanner

लोकदैवत व त्यांची जनसामान्यावर असलेली छाप, एक असीम भावना, प्रतिमा अनेक ठिकाणी अभिव्यक्त झालेली दिसते. उभ्या महाराष्ट्राचे असलेले दैवत पंढरीचा विठ्ठल व रूक्मिणी यांचे वर्णन लोकगीतातून आले आहे.

एवढंस होतं पंढरपूर, विठोबा रायाचं नगर
रखमाईच सासर, विठोबा राजा दारोदारी
शंभो मोट मोट धारी

ईश्वरभक्ती, श्रद्धाभाव, दैनंदिन कामे करताना अशा गीतातून साकार झाला आहे. अशा अनेक लोकगीतावर भारतीय पुराणाचा प्रचंड मोठा प्रभाव पडल्याचे दिसते. राम-लक्ष्मण, सीता, पांडव, द्रोपदी, मंडोधरी, तारामती, रूक्मिणी, सावित्री व हिरकणी अशा अनेक प्रकारचे संदर्भ त्यातून आपल्या जीवनाकडे पाहण्याचा स्त्रियांचा दृष्टीकोन व्यापक बनला आहे. ती एकेठिकाणी म्हणते,

एवढा सासुरवास झाला रामाच्या सीतेला
तेथून परिपाठ लागला दुनियेला

स्वातंत्र्य, स्वावलंबन, शिक्षणाचा अधिकार समाजव्यवस्थेने नाकारला. तिचे जीणे 'न स्त्री स्वातंत्र्यमहेती' या प्रमाणे राहिले. त्यामुळे आपले भाव ती लोकगीतातून प्रकट करू लागली.

**माहेरची आठवण विशद करणारी लोकगीते :**

स्त्रियांना आपल्या जीवनात सासरपेक्षा माहेर हे नेहमीच आदराचे राहिले आहे. ती सासरी दूर राहत असली तरी तिचे संपूर्ण लक्ष हे माहेरीच आईवडील, भाऊ, बहिण यांच्याकडे लागलेले असते. मराठवाड्यातील स्त्री जीवन सरंजामशाही समाजरचनेत घडलेले आहे. त्यातून स्त्रीदास्यप्रथा निर्माण झाली. तसेच त्यातून पुरूषप्रधान संस्कृती उदयास आली. सासरलाच माहेरच स्वरूप दे असे तिला सातत्याने सांगितले जाते. परंतू शेवटी आईवडीलांचे प्रेम ती शेवटपर्यंत विसरू शकत नाही.

येड्या माझ्या जिवा, तुला उलिस कळना
मात्र बापासारखी कुठ दौलत गावना

अशा अनेक गीतांमधून आईवडीलांची महती विशद केली आहे. सासर व माहेर यामध्ये सारखेपण निर्माण करणारी स्त्री ही लोकगीतातील एक दागिणा ठरते.



Scanned with OKEN Scanner

नवरीच्या बापा चिंता लागली लेकीची
कोण तिचा धनी, होईल ती कुणाची

पारंपरिक लोकजीवनात स्त्री विश्वात माहेरला अनन्यसाधारण स्थान असल्याचे लोकगीतातून भावना वेळोवेळी प्रकट झालेली आहे. आई आपल्या मुलीला सोबत संस्काराची शिदोरी देते. सासर-माहेर एक समजून प्रामाणिकपणाची शिकवण तिला देते,

सासू-सासरे आहेत, देव्हाऱ्यावरचे देव
त्यांचे आधी, मायबाची नको जेवू

सतत कामातच राम आनंद शोधणारी स्त्री, तिची सुरूवात भल्या पहाटे होते ती माहेरच्या अनेक सुखद आठवणी गीतातून जतन करते. कदाचित त्यामुळे कामाचा ताण कमी होतो अशी एक धारणा यामागे आहे.

उगवले नारायण, टाकीते शेण सडा
हात जोडीते पाया पडा ।।
पहाटेच्या पाऱ्यांमधी, पाय वंदावे गाईचे
दारी तुळशाबाईचे वृंदावन ।।
हात मी जोडीते उगवत्या बाणाला
आयुष्य मी मागते माझ्या कंथाला ।।
देवा नारायणा, सुखाचा उगळ
कुंकाचा बघरं, शेला पागोटी वागव ।।

**सासरचे वर्णन :**

मराठवाड्यातील स्त्रीजीवन हे एकेकाळी बुरखा पद्धतीत, पुरूष प्रधान संस्कृती, शारीरिक कष्टाने व्यथित झालेले आहे. वेळोवेळी सासुरवास तिला सहन करावा लागला आहे. पितृसत्ताक एकत्र कुटुंबपद्धतीत स्त्रिला अत्यंत कष्टाची कामे करावी लागतात. परंपरागत चालीरितीत कितीही श्रीमंताची लेक असली तरी तिला सासरी काम करावेच लागतात.

दळूनी कांडूनी हाती आल्यात फोड ।
आई-बाप्पा तुप्पा लाड । भंगी बोळायला धाड ।।


MCIMSD 2020 ISBN: 978-81-89730-35-2

Scanned with OKEN Scanner

सासरच्या मंडळीची मर्जी सांभाळल्याने सून ही सर्वांची लाडकी होते. ती आपल्या सासू-सासऱ्याचेही गुणगाण करते.

सासरा माझा जस्त माडीचा कळस
सासू माझी आत्याबाई जशी अंगणी तुळस

तसेच ती आपल्या सासूचेही कौतुक करते, त्यांचे पावित्र्य, त्यांची शिकवण, मोठेपण, तसेच सासूच अहेवपणही ती लोकगीतातून अभिव्यक्त करते, कृतज्ञता व्यक्त करते.

सासू माझी आत्याबाई पदर तुमचा हिरवागार
मी न लेते चुडा, चुडा माझा डौलदार

अनेक सदस्य असलेल्या या गोतावळ्यात एखादी श्रीमंत घरची सून आली असेल तर तिचा सर्वमिळून सन्मान करतात, नणंद-भावजया, जावा एकत्र एकजूटीने नांदतात, पण अशा परिस्थितीत तिचा लाड अधिक करतात याचेही चित्रण,

जावा नणंदाच्या मेळ्यात, सोन राधाच्या गळ्यात
नवा चंद्रहार सोन शोभेच्या राधाच्या गळ्यात

घरात सर्वांना मानसंन्मान देणारी, कष्ट करणारी, मोकळ्या मनाची असणारी ही सून सर्वांना खूप आवडते. तिच्या विषयी उदात्त भावना सर्वांच्या मनात असते. तिचे सासू-सासरे लाड करतात.

तिचे भाग्य किती थोर सासू ग सासरे
कोण्या भाग्याच्या नारीला दोन्ही संदक गोरीला

**दिवसाची सुरूवात ऐतिहासिक संदर्भ :**

संयुक्त कुटुंबपद्धती, ग्रामीण समाजजीवनात कृषीव्यवस्थेला महत्त्व राहिले आहे. स्त्रियांना भल्या पहाटे आजही उठावे लागते. दिवसभर सर्वांसाठी राबावे लागते. कुटुंबातील सर्वांना सांभाळण्याची जबाबदारी अप्रत्यक्षपणे तिचीच असते. सडा, संमार्जन करण्यापासून ती कामे सुरू करते. स्नान संध्या करून तुळशीला पाणी घालताना

तुळशी तुळशी पाणी घालते, कळशी कळशी घालशील कव्हा बान
माझा नमस्कार तेहतीस कोटी देवा,


MCIMSD 2020 ISBN: 978-81-89730-35-2

तुळशीला घालू पाणी तव्हा
पाप जायी रानोरानी,
तुळशीला लावू कुंकू पूजा करून गेली सखू
तुळशीला लावू बुका उद्धारून गेले तुका,
तुळशीला घालू वट्टा विघ जाई बारा वाटा
तुळशीला घालू माती पाप जाय रातोराती

ग्रामीण भागातील जीवन हे कृषीव्यवस्थेवर आधारीत आहे, शेतीत अनेक कष्टाची कामे करावे लागतात. कापणी, पाणी देणे, खूरपणी अशा अनेक प्रकारची कामे ही अतिशय कष्टाची आहेत. ऊन, वारा, पाऊस यांचा सामना करताना जगाचा पोशिंदा हा खराखुरा तिचा धनी आहे. आपल्या दैनंदिन कामात परमेश्वराचे चिंतनही करते. मातीवर प्रेम करणे ही 'बहुजनांची संस्कृती' ठरते. आजही माता मातृभूमी-मातृभाषा यांना खूप महत्त्व दिले जाते. अशा अनेक ठिकाणी स्त्रिया आपल्या आईवडीलांच नाव राखण्यासाठी अतोनात प्रयत्न करतात. सासरचा सर्व त्रास सहन करतात अशाही परिस्थितीत चारित्र्याचे संवर्धन करण्यासाठी धडपडतात, तेच अंतिम उद्दिष्ट मानतात.

माती काय जाती माती खाते मी गाळून
बापाच्या नावासाठी देह टाकिते जाळून
माती काय जाती माती खाते दोन घास
बापाच्या नावासाठी लवत घेते बारोमास
लेकीचा बाप बोल नांदून कर नाव
सोयऱ्याचं गाव खाली पाह्या नको लावू
लेकीचा बाप बोलं लेक उपजत मरावी
पाळावी पोसून धना लोकाची करावी

सेवाभावी संघटना, संस्था, शासन, प्रशासन अशा संस्थांमार्फत आज स्त्रीभृणहत्या, स्त्री जन्माचे स्वागत बेटी बचाव-बेटी पढाव अशा योजना राबविल्या जात आहेत. कुटुंबात वाढवणे, जपणे, संगोपन करताना अनेक अडचणी येताना दिसतात. बालपण ते तारूण्यापर्यंत मुलींची जोपासना डोळ्यात तेल घालून करावी लागते. प्रसंगी



Scanned with OKEN Scanner

लग्नाच्यावेळी हुंडा भरपूर द्यावा लागतो. परिणामी समाजात मुलींविषयी नकोशीची भावना वाढीस लागली आहे. स्त्री-पुरूष असमतोल निर्माण झाला आहे. लग्नानंतर सासरी सर्वांची काळजी घेणे, समर्पण, त्याग, लहान मुलांना जन्म देतांना प्रचंड यातना कुटुंबनियोजन ऑपरेशन या सर्वच बाबतीत प्रपंचात मदार स्त्रीवरच असते सकाळी उठल्यापासून ते रात्री उशीरा झोपेपर्यंत तिचे श्रम चालूच असतात. अशा अनेक अनुभवांच्या शतकांचा इतिहास स्त्रियांनी शब्दबद्ध केले.

लेकीचा जलम जसा काचेचा बंगला
लेकीच्या जलमात नवरा असावा चांगला
बाप काही बोल लेक मकाचं कणीस
जाईल परघरा होईल मोलाच माणूस
बाप काही बोल लेक हरबऱ्याची डाळ
जाईल परघरा होईल इची राळ
बाप काही बोल होईल तांदळाची गोणी
परयाच्या घरी लोटली केरावाणी
बाप काही बोल लेक देऊन सनी आलो
तुझ्या नशीबाला जामीन नाही झालो

यावरून खऱ्या अर्थाने मुलीचा बाप दैववादी होताना दिसतो. पारंपरिक परंपरेने आलेल्या अनेक लोकगीतामध्ये प्राचीन असे अनेक संकेत आलेले आहेत. ऐतिहासिक संदर्भही मोठ्या प्रमाणात दिसतात.

लंकेचा रावण, जन्मोजन्मीचा भिकारी
रामाची नेली सीता, मग पडला विचारी

तसेच

हरिचंदर तारामती, हरिचंदर तारामती
दोघांचे गुण बाई मी गाऊ किती

अशा प्रकारचे अनेक ऐतिहासिक पौराणिक संदर्भ आले आहेत.

रामराया आला घाम सीताबाई घाली वारा

पती संगतीत प्रेम-वनवास कुंठी सारा

संयुक्त महाराष्ट्र चळवळीत मुंबई, कोकण, खानदेश, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ अशा भौगोलिक विविधता असलेल्या राज्याला एका सूत्रात बांधून जनतेची एकजूट घडवून आणली.

आपल्या मनातील भावभावना साकार करताना मुलीविषयीची आस्था अनेक गीतातून उजागर झालेली आहे. हरिण, कळप, काळजाचा तुकडा अशा अनेक शब्दप्रयोगातून या बाबी साकार होतात.

लेक निघाली सासरला, येते कुणाला म्हणना

हरणी गळ्याची सुटना, नेणंती माझी बाई

लोकगीतातून सासर विषयीचे मोठेपणही यात आले आहे. दिल्या घरी सासू-सासरे, नणंदा, जाऊ-दीर अशा सर्वांसोबत प्रेमाने-सौहार्दपूर्णरितीने आचरण करण्याचा संदेशही यातून आला आहे. तू त्यांची सेवा कर, आई-वडीलांचे नाव उज्ज्वल कर. हीच 'संस्काराची शिदोरी' घेऊन माहेरहून सासरकडे वाटचाल कर असाही उपदेश केला आहे.

लेक चालली सासरला, मात्र बघती बरसातून

हरणी चालली कळपातून,

लेकीचा बाप हुंडा देताना नाही भिला

लेक जाताना कोमेजला

तसेच लेकीला दिलेली संस्काराची शिदोरी सासर माहेर एक समज ही भावना संस्कृतीची देण आहे.

सासू-सासरे आहेत, देव्हाऱ्यावरचे देव

त्याचे आधी, मायबाप नको जेवू

पती हाच परमेश्वर, पतीप्रेम, पतिव्रता ही स्त्रियांच्या चिंतनातील बाबी पूर्वी बालपणी विवाह लावून दिले जात असत, पतीच्या प्रेमावरच ती त्याच आधाराने जीवन जगत असे ही जाणीव सुद्धा एक लोकगीतात स्वाभाविकपणे मांडली आहे.

भ्रताराच सुख सांगतेव सखीला

मुखीच्या विड्याचा, लाल रंग नथीला

पतीची प्रतिष्ठा अबाधित ठेवण्यासाठी ती नेहमी तत्पर असते. मान-सन्मान प्रतिष्ठा ही आपल्यालाही त्यातूनच मिळवत असते. मराठी लोकगीतातील ही स्त्री पतीची आब जाऊ नये यासाठी प्रयत्नरत असते.

देवाच्या पायाला, रूक्मिण लाविते लोणी
सत्य सांगा हो स्वामी, जनाबाई कोण व्हावी?
धोतराला काळा डाग, जनीच्या काजळा

पतीच्या सहवासात व सेवेतच सुख-दुःख शोधते. तो आपल्याशीच एकनिष्ठ रहावा यासाठी अखंड धडपडते, हाच भाव व्यक्त करण्यासाठी ती पौराणिक संदर्भ देते.

पांडुरंग बोलतात, खरं सांगतो रूक्मिणी
जना माझी, वहिती वाणी

मराठी लोकसाहित्यात स्त्रीजीवन हृदयस्पर्शी, मनोवेधक, आदर्शवत असल्याचे रेखाटले आहे.

**थोडक्यात :**

मराठवाड्यातील स्त्रीयांची लोकगीते एक समृद्ध असे दालन आहे. भारतीय संस्कृतीत लोकसाहित्य महत्त्व असून लोकगीत ही त्यातील आत्मा. स्त्रीमन ही नेहमीच समाधानाने ओथंबलेले, संस्कृतीचे वहन करणारी जणू शक्तीच आहेत. परंतू कुठेतरी ही संस्कृतीची देयक असलेली लोकगीते आज पाश्चात्य व आधुनिकीकरणात मागे पडताना दिसत आहेत. परिणामी संस्कृतीचे दुभंगलेपण दिसत आहे. विभक्त कुटुंबपद्धती सर्वत्र नव्याने येत आहे. प्रचलित समाजव्यवस्था पूर्णपणे बदलत चालली आहे. त्यामुळे नव्या पिढीला या गीताशी कांहीही देणघेण नाही. हे मात्र आजचे वास्तव नाकारता येत नाही. लोकगीत भाषा, शब्द, अर्थ, लालित्य, ओजस्वीपणा या विविध बार्बीचा ऱ्हास होतो की काय असे वाटत आहे.

**संदर्भ :**

१. डॉ. मांडे प्रभाकर : 'लोकसाहित्याचे अंतःप्रवाह', गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, तिसरी आवृत्ती, २००८.
२. डॉ. बाबर सरोजिनी : 'दसरा-दिवाळी', म.शा.शि. विभाग, मुंबई, प्र.आ. १९९०.
३. शिंदे ताराबाई : 'स्त्री-पुरूष तुलना'.
४. डॉ. खंदारे साहेब : 'लोकसाहित्य शब्द आणि प्रयोग'.



Scanned with OKEN Scanner

५. डॉ. व्यवहारे शरद : 'मराठी स्त्रीगीते', प्रतिमा प्रकाशन, पुणे.

६. डॉ. भवाळकर तारा : 'लोकसाहित्य', य.च.म.मु. विद्यापीठ नाशिक, १९९४.

 ISBN: 978-81-89730-35-2

Scanned with OKEN Scanner